अण्णा भाऊ साठे

माझा रशियाचा प्रवास





अण्णा भाऊ साठे

यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

▪ कादंबरी ▪

फकिरा

आवडी

वैर

पाझर

▪ कथासंग्रह ▪

गजाआड

▪ प्रवासवर्णन ▪

माझा रशियाचा प्रवास

सुरेश एजन्सी

माझा रशियाचा प्रवास

अण्णा भाऊ साठे

सुरस एजन्सी

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ,
पुणे ४११००२

पाचवी आवृत्ती
ऑगस्ट २००३

मुद्रक
रा. म. नाईक
लताली प्रिंटर्स
२२ बुधवार पेठ,
पुणे ४११००२

किंमत ४० रुपये

दिलीप व हेमंत ऊर्ध्वरेषे यांना –

१. मुंबई ते मॉस्को

आपण वाटेल ते करून एकवेळ सोव्हिएट संघराज्य पाहावे, असं मला फार फार वाटत होतं. ती आशा माझ्या मनात दिवसेंदिवस सारखी प्रबल होत होती. रशियातील ते कामगार-राज्य कसे असेल, तिथं कॉ. लेनिनं केलेली क्रांती मार्क्सचे महान तत्त्वज्ञान कसे साकार झाले असेल, ती नवी दुनिया, नवी संस्कृती, नवी सभ्यता कशी फुलत असेल या विचारानं माझं मन

भारावलं होतं. मी वेडाच झालो होतो.

मी सन १९३४ च्या दरम्यान अनेक जप्त पुस्तके वाचली होती. रशियन क्रांतीचा इतिहास, कॉ. लेनिनचे चरित्र या पुस्तकांनी माझ्या मनावर खूप परिणाम केला होता. आणि म्हणूनच मी रशिया पाहण्यासाठी उत्सुक झालो होतो. कसंही करून एकदा रशियाकडं सरकावं असा माझा विचार झाला होता. मी खटपट करीत होतो. मी दोन वेळा पासपोर्ट मिळावा म्हणून अर्ज करून पाहिला. पण त्यावेळचे मुंबईराज्याचे मुख्य मंत्री भलतेच कडक होते ! त्यांनी मला विश्वासात घेऊन सुनावले की, बाबा तू आमचा वैरी आहेस. खरोखरी सांगतो की, आम्ही चांगली माणसं म्हणून तू बाहेर आहेस. नाही तर यावेळी तुझी जागा तुरुंगात ... ... तो काळ १९४८ चा होता. त्या वेळी माझे मित्र सिनेनट श्री. बलराज सहानी यांनी माझी पॅरिसपर्यन्तची तिकिटेही काढली होती. कारण पॅरिस येथे भरणाऱ्या जागतिक शांतता परिषदेचे मला निमंत्रण आले होते; पण जमले नाही.

पुढं १९६१ साली माझ्या 'फकिरा' या कादंबरीला राज्य सरकारचे पहिले पारितोषिक मिळाले आणि याच वेळी इंडो सोव्हिएट कल्चर सोसायटीनं मी रशियास जावे, असं ठरवलं. त्या संस्थेचे मला पत्र मिळताच मी पुन्हा प्रयत्न करू लागलो; पण जवळ एक पैसाही नव्हता.

परंतु जेव्हा मी रशियाला जात आहे, ही गोष्ट महाराष्ट्राला समजली तेव्हा एक चमत्कार घडला. माझ्यावर पैशाचा पाऊस पडला. एकाच दमात माझा अर्धा खर्च निवारला ! त्यामुळे पुढं अनेक भानगडीतून जाऊन मला रशियाला जाण्याचा पासपोर्ट मिळाला. माझी तयारी झाली. मला गगन ठेंगणं वाटू लागलं. न पाहिलेला रशिया माझ्या डोळ्यापुढं तरळू लागला.

शाहीर द. ना. गव्हाणकर यांनी मला कित्येक तास बसून रशियात कुठं

काय आहे, कसं वागायचं, कसं बोलायचं, याचे धडे दिले. कारण मुंबई ते सातारा हा प्रवासही मी कधी एकटा करीत नाही. तो मी मॉस्कोला जाणार! हा प्रश्न माझ्या दृष्टीनं मोठा कठीण होता. देश, आप्त, घर सोडून मी एकट्यानं इतकं दूर जायचं म्हणजे माझ्या बाबतीत फारच अवघड होतं.

दुसऱ्या महायुद्धात सोव्हिएट जनतेने पराक्रमाची शर्थ केली होती. त्यामुळे मी उत्स्फूर्त होऊन स्टालिनग्राडच्या लढाईवर एक पोवाडा लिहिला होता. माझी प्रतिभा लाल सैन्याबरोबर बर्लिनपर्यंत गेली होती. आणि आता मी स्वत: मॉस्कोपर्यन्त जाणार होतो.

इंडो–सोव्हिएट कल्चरल सोसायटीच्या शिष्टमंडळात माझा समावेश झाला होता, पण मुंबईहून दिल्लीपर्यन्त एकटा जाऊन मग मला इतर सभासद भेटणार होते. त्यांपैकी एकालाही मी ओळखत नव्हतो.

घरापासून विमानतळापर्यन्त माझ्या अनेक मित्रांनी–आप्तांनी मला फुलात बुजवलं. आशीर्वाद दिले. विमानतळावर अनेक दोस्त आले होते. त्यांना आनंद झाला होता. मी मात्र मनात खचलो होतो. मॉस्कोचा प्रवास नि तोही विमानानं या कल्पनेनं मला धडकी भरली होती. माझे मित्र मला एक एक सूचना करीत होते. एक म्हणाला, ‘ तुम्ही रशियात झोपड्या किती आहेत, तेवढ्या पाहून या बरं का! ’

एकानं सांगितलं, ‘ पुलाखाली किती लोक राहतात, याची काळजीपूर्वक तपासणी करा. ’

एकजण गंभीर चेहरा करून म्हणाला, ‘ पोलादी पडद्याची जाडी किती आहे, याची नोंद करून लवकर या! ’

एकानं देव निर्वासित झाले आहेत, ते कुठं राहतात, त्यांची परिस्थिती काय आहे, हे न चुकता तुम्हीच—अशीच सूचना केली. आणखीही कित्येक सूचना आल्या. वर्णभेद...व्यक्तिस्वातंत्र्य ..बेकारी... म्हणजे सर्व रशियाचे संशोधन करून मी यावे, असेच त्यांचे मत होते आणि मी हुं म्हणून ऐकत

होतो. माझ्यापुढं ते विमान शांत उभं होतं, पण माझा आत्मा उडाला होता. काळीज धडधडत होतं. त्यामुळे मी बोलत नव्हतो. फक्त हुं म्हणून मुंडी डोलवून वेळ काढीत होतो.

सूचना, उपदेश, फुले, हार, आशीर्वाद हे सर्व घेऊन मी ता. १२ रोजी रात्री अकरा वाजता दिल्लीकडे विमानाने भरारी मारली. त्यावेळी महाराष्ट्राची भूमी अंधारात गडप झाली होती. ती दिसावी म्हणून मी धडपडत होतो. मी विमानाकडे जाते वेळी हात उंचावून उभी असलेली माझी आप्तमंडळी, शंकरभाऊ, शांता, शकू, शाहीर द. ना. गव्हाणकर, गणपत सातपुते, श्री. वैराळे, श्रीमती जयवंताबाई या सर्वांच्या मूर्ती माझ्या डोळयापुढून हालता हलत नव्हत्या. गणगोत, देश, घर सोडून दूरदेशी जाताना किती दुःख होतं, याचा मला त्यावेळी अनुभव आला.

सकाळी पाच वाजता पालम विमानतळावर माझ्या विमानानं पाय टेकले नि माझा जीव भांडयात पडला.

अगदी सूर्योदयापूर्वीच मी खासदार एस. ए. डांगे यांच्या बंगल्यावर दाखल झालो. तेव्हा 'डी.' झोपले होते. सौ. उषाताई डांगे यांना मी आल्याचं समजताच त्या हसत पुढं झाल्या. 'आमचा अण्णा मॉस्कोला निघाला,' असं म्हणून त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. तेव्हा मला माझ्या आईची आठवण झाली.

उषाताईनं घाई केली. पैसे घेऊन त्या माझी तयारी करायला तयार झाल्या, पण मी मुंबईहून निघताना सर्व तयारी केली होती.

ताईनं विचारलं—' अण्णा, कपडे ? '

' घेतले आहेत— ' मी उतरलो.

' बूट—? ' ताईनं दुसरा प्रश्न केला.

' आहेत. ' मी उत्तर दिले. हे ऐकून ताई निर्धास्त होऊन हसल्या आणि माझ्यासाठी काय काय खरेदी करावे, यांचा विचार करू लागल्या.

दुपारीच ताश्कंदपर्यन्तचं जाण्यायेण्याचं तिकीट आणि व्हिसा माझ्या हाती पडल्यानं मी विवंचनामुक्त झालो.

दुसऱ्याच दिवशी पुढं जायची तयारी करू लागलो. कपडे करून आवराआवर केली. तोच कॉ. डांगे शांतपणे माझ्याकडे आले. माझा तो साहेबी पोशाख पाहून गालात हसलें. मग त्यांनी माझा गळबंध सरळ बांधला. अंगातील कोटावरून स्वतः ब्रश फिरविला आणि पाठीवर थाप मारली ! ज्या हातांनी कामगारांच्या अनेक पिढ्या घडवल्या नि लढवल्या ते हात पाठीवरून फिरताच माझं काळीज डोंगराएवढं झालं ! मुंबईत आचार्य अत्रे आणि दिल्लीत कॉ. डांगे यांचे आशीर्वाद घेऊन 'चितोडकी रानी' या भारतीय विमानातून मी आकाशात झेप घेतली. त्यावेळी मातृभूमी सोडण्याचे दुःख आणि सोव्हिएट देश पाहण्याचे सुख यांचा विलक्षण संगम. माझ्या अंतःकरणांत निर्माण झाला होता. मी पुनः पुन्हा आपली धरती पाहत होतो आणि तिचे दर्शन घेत होतो. मी लवकरच परत येणार आहे, हे मी विसरलो होतो. ...

विमान सारखं उंच चढत होतं. 'चितोडकी रानी' हे अत्यंत सुंदर नि सुसज्ज विमान पाहून मी चकित झालो होतो. ते विमान हिमालयाला बगल देऊन भरारी मारीत होते. खाली डोंगर टेकडीसारखे दिसत होते. नद्यांना ओघळीचं स्वरूप आलं होतं. एखाद्या शहरातील इमारती काडयाच्या पेटयांएवढया दिसत होत्या.

दिल्लीच्या पालम विमानतळावर शेवटचा प्रवासी म्हणून 'मी' चितोडकी रानी' या विमानात चढलो, तेव्हा माझे सहप्रवासी मला पाहून गालात हसलें. 'हा एक महामूर्ख आहे बरं का,' असा त्यांचा चेहरा बोलला. मी आपला गुमान विमानात बसलो. कुणी माझी दाद घेतली नाही. रंग काळा, पोशाख साधा, गळ्यात टॉय नीट नाही. मग मला शहाणा कोण म्हणणार?

परंतु त्याच विमानात सिलोनचे युवक प्रतिनिधी होते. त्यांत एक सिलोनी

कम्युनिस्ट पार्टीच्या मुखपत्राचे संपादक आणि एक सिलोनी लोकसभेचे सभासद होते. त्यांना माझा पत्ता लागला. त्याच महिन्यात 'मनोहर'मध्ये माझा परिचय आला होता. तो सौ. मीनाक्षीबाईंनी लिहिला होता आणि 'खापऱ्या चोर' या माझ्या तमाशातील माझे चित्र छापले होते. विमानात तो अंक कोणी तरी दाखवला आणि हा 'खापऱ्या चोर' या विमानात आहे, ओळखा अशी चर्चा सुरू झाली. शेवटी काहींनी मला हेरलं नि मग मी आपल्या सिलोनी मित्रात दंग झालो. ताश्कंदपर्यन्त आमच्या शिष्टमंडळानं माझी दाद घेतली नाही.

परंतु ताश्कंदला पोहोचताच त्यांचे डोळे उघडले आणि मीही एक चांगला माणूस आहे, अशी त्यांची खात्री झाली.

मद्रासचें जॉन माझ्या गळयात पडले. म्हणाले, —साठेजी, आमचे सारेच चुकले, माफ करा, आम्ही तुम्हाला वेगळे ठरवले होते. परंतु आता आमची खात्री झाली की तुम्ही फार चांगले आहात—

बरोबर पाच वाजता 'चितोडकी रानी' हे विमान उझबेकिस्तानची राजधानी ताश्कंद येथे उतरले. तेव्हा अनेक उझबेकी मित्रांनी फुले देऊन आमचे स्वागत केले. एक उझबेकी मित्र पुढं येऊन म्हणाला, 'आता तुम्ही थोडा आराम करा. न्याहारी करा. कारण तुमच्यासाठी सोव्हिएटचे जेट विमान तयार आहे.'

'परंतु 'चितोडकी रानी'मध्ये असलेल्या आमच्या सामानाचं काय?' मी विचारलं. तो सद्गृहस्थ हसून म्हणाला, 'ते सर्व ठीक होईल. तुम्ही काही काळजी करू नका.'

ताश्कंद येथे आम्ही प्रथम आपली घडयाळं अडीच तास मागं घेतली आणि बरोबर सात वाजता सोव्हिएट विमानात चढलो. 'ए' क्लासमध्ये आमची सोय केली होती.

माझे विमान चाळीस हजार फूट उंचीवरून ताशी आठशेपन्नास किलो-

मीटर्स वेगाने धावत होते. त्या विमानातील आतील व्यवस्था साधीच वाटत होती. प्रत्येक ठिकाणी वेलवेटचे लाल नि जांभळे पडदे लटकत होते. त्या पडद्यांमुळे आमची मोठी पंचाइत झाली होती. प्रत्येक पडद्यामागे काही तरी असे. निरनिराळ्या जागी निरनिराळे पडदे लोंबत होते. कुठं शौचकुप होते, तर कुठं स्वयंपाकगृह होते. कुठं नोकरांचे विश्रांतीस्थान होते नि त्या प्रत्येकाच्या दारापुढे ते पडदे लटकत होते. प्रत्येक दारापुढे रशियन भाषेत त्या स्थानाचे नाव लिहिले होते आणि ते आम्हांला समजत नव्हते. त्यामुळे आमची परिस्थिती कठीण झाली होती.

आमच्या शिष्टमंडळात बंगालचे चतर्जी या नावाचे एक वृद्ध वकील होते. ते विमानात चढले की झोपत आणि जागे झाले की प्रथम शौचकुपाची चौकशी करीत. एक तास विमानाचे भ्रमण झाले आणि श्री. चतर्जी एकाएकी जागे झाले. त्यांनी प्रथम सर्वत्र नजर टाकली. निरनिराळ्या पाट्या वाचून पाहण्याची खटपट करून पाहिली, पण शौचकुप कुठे आहे, याचा पत्ता लागेना. मग त्यांनी अनेक पडदे वर करून पाहणी केली, पण काहीच पत्ता लागला नाही. अखेर त्यांना हवाई सुंदरीची मदत घेणे भाग पडले.

विमानाची ती भयंकर दौड पाहून माझा मीच स्तंभित झालो होतो. अनेक विचारांनी माझं डोकं सुन्न झालं होतं.

अंतराळातून माझे विमान उडत होते. ते ढगाच्या राशीतून मार्ग काढीत होते. खाली निरनिराळी शहरे दिसत होती. म्हणजे अनंत दिव्यांच्या पुंजक्यांवर खाली एखादं शहर असावे, असं मी समजत होतो. माझं मन स्वदेशात घुटमळत होतं. विमानाने मुंबई ते मॉस्को या दरम्यान मी भरारी मारीत होतो. माझ्या चक्षूंपुढं मुंबई दिसत होती. माझ्या आईच्या प्रतिमेपुढं शांता नि शकुंतला यांनी एक निरांजन लावले होते. ते मी परत येईपर्यंन्त जळणार होते. त्याचा मी विचार करीत होतो. ते निरांजन जळत असेल, तेवत असेल....

'आला आला' म्हणत मॉस्को विमानतळ आला. आम्हाला सिगार ओढू नका, कमरेला पट्टे लावा, मॉस्को आले अशी सूचना मिळाली. मी खिडकीतून खाली पाहिले. ते मॉस्कोचं पहिलं दर्शन घडताच मन विचारमुक्त झाले. ती मॉस्को नगरी मी प्रथम आकाशातून पाहिली आणि तिची कीर्ती आठवली.

विमानानं एक जंगी झेप घेऊन धरणीवर पाय टेकले. मी सावध झालो. निःश्वास टाकून ऊर रिकामं केलं. विमानाच्या दारात तशा रात्री अनेक मित्र फुले घेऊन आले होते. बाहेर थंडी मी म्हणत होती. थंड वारे सर्वत्र धावत होते. अंगाला चावत होते. माणसाच्या नाका-तोंडातून वाफेचे लोट निघत होते.

मी पार गांगरलो होतो. मला भानच उरले नव्हते. माझा चेहरा पडला होता. मी कुठंतरी पाहत होतो. त्या गडबडीत आपला ओव्हरकोट अंगात घालायचा मला विसर पडला होता. सर्वांच्या शेवटी मी पाय ओढीत चालत होतो. मी आपला ओव्हरकोट काखेत दाबून धरला होता आणि चोरासारखा सर्वत्र पाहत होतो. समाजसत्तावादी माणसं न्याहाळीत होतो. भयंकर थंडी वाजत होती. त्याची मला जाणीव नव्हती. थोडक्यात मी भांबावूनच गेलो होतो.

'तुम्हाला थंडी वाजत नाही?' कझकीना नावाची एक महिला जवळ येऊन म्हणाली. त्यामुळे मी अधिकच गोंधळून गेलो नि उत्तरलो— 'छे, कुठं आहे थंडी—' पण त्यावेळी माझ्या नाकातोंडातून वाफेचे लोट बाहेर पडत होते. ते पाहून मी स्वतःच पुन्हा घोटाळ्यात पडलो नि कझकीना मोठ्यानं हसल्या. ओव्हरकोट अंगात घालायचं विसरून हा माणूस थंडीनं कुडकुडत आहे, हे लक्षात येऊन त्या हसत होत्या. त्यांनी मला थांबवलं. उभं करून मग माझा कोट घेऊन त्यांनीच तो माझ्या अंगात घातला आणि मग मला बरं वाटलं. मी भानावर येऊन चालू लागलो. कझकीनाबाई अगदी

नम्रपणे म्हणल्या— ' ही आमची मॉस्को नगरी. ती तुम्ही उद्या पहालच—"

'हं.' करून मी चौफेर नजर टाकली आणि पुन्हा कझकीना म्हणाल्या, 'हे मॉस्को आमचं हृदय आहे.' ते उद्‌गार ऐकून मी आश्चर्यानं चमकलो. 'खरं आहे तुमचं म्हणणं.' असं म्हणून मी ढेंगा टाकू लागलो. कझकीना म्हणाल्या, 'हे वातावरण तुम्हाला कसं वाटतं ?'

'अगदी आमच्या दिल्लीसारखं—' मी उत्तर दिले. आता माझा पडलेला चेहरा बराच उठला होता.

विमानतळाहून आम्ही मोटारीनं शहराकडे जात होतो. आमच्या मोटारी वेगानं दौड मारीत होत्या. आमचे शिष्टमंडळाचे सभासद दबक्या आवाजात आपसात बोलत होते. त्या चार मोटारी वळणं घेत होत्या. माझ्या बरोबरचे मद्रासचे श्री. जॉन बसले होते. हे जॉन पियानोचे दर्दी म्हणून त्यांची या शिष्टमंडळात निवड झाली होती. ते फारच शांत स्वभावाचे नि प्रेमळ होते. मी मोटारीच्या खिडकीच्या काचा खाली करून बाहेरची दिव्यांची झुंबरं पाहत होतो. थंड वारा मोटारीत शिरून अंगाला चावत होता. त्या चावऱ्या वाऱ्यानं जॉनच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहात होत्या. त्या पाहून मी विचारले,

'काय मित्रा, रडू का येतंय ?—'

' मुळीच नाही— ' जॉन चिडक्या सुरात म्हणाला, ' मी कधीच रडत नाही, पण एक विचारू ? '

' अरेच्या, त्याला परवानगीची काय गरज आहे ? ' मी म्हणालो, ' विचारा ना ? '

'एवढ्या कडाक्याच्या थंडीतही तुम्ही खिडकीची काच खाली केली आहे, याचं कारण काय सांगाल का ? '

' त्याचं असं आहे, ' मी म्हणालो, ' आपण इकडे आलो आहोत

ते सर्व काही पाहण्यासाठी. तेव्हा माझं असं मत आहे की, आपण जे काही पाहायाचं 'कसलीही काच न लावता पाहू या. आता रडता का ?'

मिस्टर साठेजी ' जॉन म्हणाला, 'तुमचं अर्ध म्हणणं मला मान्य आहे. आपण सर्व काही सरळ पहावं, पण या थंडीत माझ्या डोळ्यांना त्रास होतोय. मी रडतोय हा समज चुकीचा आहे.

मी त्या राजरत्यानं मॉस्कोकडे जात होतो. आनंद झाला होता, पण आता भाषेची अडचण पडून आपला हा रशियाचा प्रवास व्यर्थ होणार, याची मला बोचणी लागली होती. आमच्या या शिष्टमंडळात बंगाल, मध्यप्रदेश, गुजराथ, मद्रास अशा निरनिराळ्या प्रांतातील लोक होते. सर्वजण वेगवेगळ्या व्यवसायातील होते. सर्वांना इंग्रजी येत होते; परंतु मी एकटाच असा होतो की मला कोणतीही परकी भाषा येत नव्हती. थोडीशी हिंदी आडवी तिडवी बोलता येत होती एवढंच.

मी 'सोव्हिएट स्काय ' या आलिशान हॉटेलात पोहचलो. तेव्हा तिथ मला कॉ. बारनिकोव भेटले. त्यांनी एकदम पुढं येऊन माझा हात धरला नि शुद्ध हिंदी भाषेत बोलायला आरंभ केला,

' —मी बारनिकोव. मी लेनिनग्राडचा आहे. तुम्ही येणार म्हणून मला मुद्दाम तुमच्यासाठी बोलावलं आहे. आता एक महिना मी आपल्या बरोबर असणार म्हणजे आपल्या दुभाष्याचे काम करणार— ' कॉ. बारनिकोवचे ते शुद्ध हिंदी, मोकळा नि गोड स्वभाव पाहून मला आनंद झाला. नंतर मी आपल्या खोलीत गेलो आणि पुन्हा कॉ. बारनिकोव यांनी येऊन विचारले—' उद्या काय काय पाहणार आहात ?—'

' प्रथम रशियातली माणसं—' मी उत्तर दिले आणि कॉ. बारनिकोव गालात हसले.

२. रशियातील भ्रमंती

मी रशियात जाण्यापूर्वी माझी ' चित्रा ' ही कादंबरी रशियन भाषेत प्रकाशित झाली होती. काही कथांचा अनुवादही झाला होता. माझी ' सुलतान ' ही कथा रशियन लोकांना फारच आवडली होती. हा ' सुलतान ' मला अमरावतीच्या मध्यवर्ती तुरुंगात भेटला होता. तो माझ्या आधी कथारूपाने रशियात पोहोचवला होता. त्यामुळे ' सुलतान ' फेम अण्णाभाऊ साठे असं माझ्या-

बद्दलचा मजकूर छापताना लिहिलं जात होतं.

माझा ' स्टालिनग्राड ' चा पोवाडा तर रशियात फारच लोकप्रिय झाला होता. आणि हे सर्व पुण्य पदरी घेऊन मी रशियात भ्रमण करीत होतो.

पहिल्या दोनच दिवसात ओहक–पाणी, पिचस्की–आगपेटी, खराश, खरे आहे हे शब्द मी शिकलो.

आम्ही मॉस्कोत पोहोचलो आणि आमच्यापुढं एक नवीन पेच पडला. दोन डॉक्टर, एक आमदार, एक सॉलीसिटर, एक पियानोवादक नि एक लेखक म्हणजे मी, अशा सहा लोकात पाच आवडी उभ्या राहिल्या आणि आम्ही त्यांचा विचार करू लागलो. जो तो आपलं मत पुढं रेटू लागला.

दोन डॉक्टर कासा वर करून सरळ म्हणाले, ' रशियात जेवढी म्हणून शस्त्रक्रिया होणार आहे, ती आम्हाला पाहिलीच पाहिजे, नाही तर रशियात येऊन आमचा काय फायदा ? ' या दोन डॉक्टरांपैकी एक हैद्राबादचे शहा हे स्वतःच आजारी होते आणि स्वतःवर एक शस्त्रक्रिया करून घेण्याच्या उद्देशाने ते आले होते.

दुसरे डॉक्टर दयालू, हे म्हैसुरी गृहस्थ होते. त्यांना हिंदी भाषा तर मुळीच येत नव्हती.

लखनौचे आमदार पुष्कराज हे नाकीडोळी तरतरीत होते. तशात त्यांचा पोशाखही नीटनेटका म्हणजे नेहरू टाईप होता. ते म्हणाले, ' मला रशियात लोकशाही आहे का, याची चौकशी करायची आहे. आपण कायदे-मंडळाचे कामकाज पाहणार. कुत्र्याची चिरफाड पाहून आमच्या पोटात काय पडणार ? ' एवढं बोलून ते थांबले. परंतु आपण खाटीक नाही, असा त्यांनी चेहरा केला.

नंतर कलकत्त्याचे सॉलीसिटर श्री. चतर्जी पुढे झाले. कलकत्त्याचा उच्चार करताना ते 'क'चा उच्चार 'कु' करीत. म्हणजे ते सरळ ' कलकुत्ता ' म्हणत. ते म्हणाले, ' मला कुत्र्याचे ऑपरेशन नको नि

कायदेमंडळाचा काथ्याकुटही नको! माझा जो पेशा आहे तो मला हवा. मी या रशियातील न्यायपद्धती पाहणार आहे. रशियात अन्यायाचे राज्य आहे, असं मी फार ऐकलं आहे. तेव्हा मला कोर्टात घेऊन चला—'

यानंतर मद्रासचे जॉन उठले. या जॉनच्या डोळयांच्या पापण्या मंद गतीनं उघडझाप करीत. ते हसू लागले की त्यांच्या डोळयांतून पाणी येई. ते म्हणाले, 'मी एक कलावंत आहे. मी पियानोवादक आहे. मला कुत्र्याचे ऑपरेशन पाहयची इच्छा नाही; कारण माझी पत्नी डॉक्टर आहे. आमच्या या शिष्टमंडळाची रचनाच मुळी क्लिष्ट झाली आहे. मी आपला पियानो ऐकणार, तुम्ही काहीही करा—'

शेवटी माझी पाळी आली. मी म्हणालो, 'मला फक्त या देशात फुटपाथनं भटकायचं आहे.' हे ऐकून त्या सर्वांनी एकमेकांच्या तोंडाकडे पाहिलं.

अखेर असं ठरलं की ज्याला जे आवडेल ते त्यानं पाहावं.

दुसरे दिवशी भारतीय दूत निवासाचे निमंत्रण आले. तिकडे आम्ही वेळेवर पोहोचलो परंतु युवक प्रतिनिधी अजून येणार होते. मी दारातच फुटपाथवर थांबलो. माझ्यापुढं रस्तादुरुस्तीचं काम चाललं होतं. अवघी पाच माणसं ते काम करीत होती. पाच माणसं नि एक मोटार एवढंच. दुसरं काहीच नव्हतं. उकरण्याचं, माती भरण्याचं नि पूर्वीचं डांबर वितळवून काढण्याचं काम ती मोटार करीत होती. बाकीचे कामगार सूटबूट घालून देखरेख करीत होते. आमच्याकडील बड्या ऑफिसरांसारख्या त्यांचा थाट होता. तिथं सक्ती नव्हती. गुलाम नव्हते. मात्र ते यंत्रच त्या माणसाचा गुलाम होऊन गुमान काम करीत होतं.

भारतीय दूत निवासात जाताच मन भारतीय जीवनाकडं धावलं. भारतीय संस्कृतीनं बहरलं. घरची आठवण झाली. जिना चढून जाताच महात्मा गांधी आणि पंतप्रधान नेहरू यांच्या प्रतिमांचं दर्शन झालं, आणि

मुख्य दालनात जाताच आपण मॉस्कोत नसून दिल्लीत, मुंबईत कुठं तरी आपल्या देशात आहोत, असं वाटलं तशी त्या दालनाची रचनाच केली होती. कोणत्याही देशाच्या व्यक्तीला तिथं जाताच आपण भारतीय दूत निवासात आहोत, याची चटकन जाणीव होईल असाच तिथला साज-सरंजाम होता.

थोडया वेळानं एक चमत्कार झाला. निरनिराळया दारूचे प्याले भरलेले पात्र पाहुण्यांच्या घोळक्यातून फिरू लागले. त्या पाठोपाठ भारतीय कबाब आला आणि थोडयाच वेळात डोकी धडावेगळी झाली ! म्हणजे कामातून गेली ! माझं तर नक्कीच बेकार झालं !

त्या समारंभाला आम्ही युवक प्रतिनिधी, मॉस्कोतील अव्वल दर्जाचे विद्वान नि मॉस्को ॲकॅडमीचे काही विद्वान सभासद हजर होते. तो दिवस माझा आनंदात गेला. अनेक भारतीय मित्र मला त्या भारतीय दूत निवासात भेटले. ज्यांच्याबरोबर मी अनेक संकटातून गेलो, एका बंद खोलीत दिवस काढले, पुरीभाजी खाल्ली, ते मला मॉस्कोत भेटले. म्हणजे गळयात पडून हृदयात आनंदाचा सागर घेऊन भेटले.

आणि तो अपार आनंद उरात घेऊन मी रात्री लेनिनग्राडकडे रवाना झालो.

रशियामध्ये माझा प्रवास विमानानंच फार झाला. रेल्वेनं फक्त एकदा लेनिनग्राडला गेलो. आणि पुढं आजारबैजानची राजधानी बाकूहून ब्लीसी-पर्यन्तचा मी रेल्वे प्रवास केला. नाही तर एरव्ही उठसूट पंख फुटल्याप्रमाणे मार भरारी असा माझा क्रम झाला होता.

लेनिनग्राडला जाते वेळी आमची व्यवस्था उत्तम केली होती. एका कंपार्टमेंटमध्ये दोन पलंग, स्वच्छ गाद्या, तशाच उशा, चादरी, नळ, कंगवा, साबण, पावडर, रेडिओ म्हणजे सारंच ! शिवाय प्रवाशाची देखभाल करायला एक बाई होती. ती प्रेमळ बाई आपली मूलं झोपली

का याची आईनं चौकशी करावी तशी खपत होती.

मला तो रेल्वे प्रवास कसासाच वाटला. मला पटकन बोरीबंदर स्टेशनची आठवण झाली. ती गर्दी, तो कोलाहल, ती धावपळ, त्या मारामाऱ्या, डब्यात ठासून भरलेली माणसं, त्यांचा गलका, बिथराबिथरी नि 'बोल बंबा देवी की जय' हा सर्व प्रकार माझ्या हाडीमासी भिनलेला! मी त्याला कसा विसरू? तशापैकी त्या स्टेशनात काहीच नव्हतं. सर्व काही शांत शांत वाटत होतं. फलाटावर जळकी काडी नव्हती. पेटती सिगारेट नव्हती. मग बिचारी विडी कोठून येणार! त्या स्टेशनमध्ये एक तर पोस्टरांची जत्रा भरली नव्हती आणि जी होती ती स्वच्छ होती. त्यावरून मी कल्पना केली की, येथे थुंकू नये. असं पोस्टर लावताच त्यावर पान खाऊन थुंकणारा प्राणी या रशियातच नसावा. नाही तर हे इतकं सुंदर पोस्टर घाटकोपरला एवढ्या आरामात काय राहातं! कधीच याच्या बत्तर बाळघा झाल्या असत्या. पोस्टरवरच्या मीनाकुमारीला मिशा लावणाऱ्या आणि पृथ्वीराजच्या मिशा भादरणाऱ्या कलावंतानी कधीच आपली कला दाखवली असती!

गाडी सुरू झाली होती. लेनिनग्राडकडे धावत होती. बाहेर अंधार होता. मी बाहेर पाहण्याचा प्रयत्न करून काहीच उपयोग झाला नाही. बाहेरचं काहीच दिसत नव्हतं. मला झोप लागत नव्हती. मी जॉनला बरोबर घेऊन बाहेर पडलो. गाडीत चालू लागलो. आपल्याकडच्या टी. सी. च्या ऐटीत निघालो, परंतु सारी गाडी शांत होती. काही लोक निवांत झोपले होते. काही वाचीत बसले होते. कुठं पत्त्याचा खेळ चालला होता. मध्येच काहीतरी विनोद होऊन हास्याचा स्फोट होत होता. परंतु उठबसणीचा खेळ कुठं दिसला नाही. बाकाखाली आराम नाही की संडासात दडी मारलेला महाभाग नाही! सारंच निराळं! जर या गाडीत गर्दीच नाही तर इथं खिशाला कात्री लावणारा कारागीर कसा असणार! याचा विचार करीत मी एका डब्यात शिरलो. तिथंही सारं शांत. मला टी. सी. हा प्राणीच

दिसला नाही. 'जय सौजन्य सप्ताह' म्हणून प्रवाशाच्या टाळक्यात जोडा मारणारा सज्जन टी. सी. मला कुठंच भेटला नाही !

मात्र एका प्रसंगानं मला स्तंभित केलं. एका खिडकीजवळ एक सुंदर तरुणी बसली होती. तिची मान कलती होऊन ती काचेवर टेकली होती. तिने डोळे झाकले होते. ते डोळे न उमललेल्या कळीप्रमाणे बंद होते. तिच्या पुढे एक लहानसा पाळणा लोंबत होता नि त्या शुभ्र पाळण्यात एक लहानसा रशियाचा नागरिक विसावा घेत होता. आईच्या कुशीत मनसोक्त निद्रा घ्यावी तसा तो निद्राधीन झाला होता. त्याला त्याच्या लेनिनने सर्व काही दिले होते. तो एक महिन्याचा असावा. परंतु आतापासूनच रशियन संघराज्य त्याची काळजी घेत होतं. त्याला प्रवासात एक सुंदर पाळणा दिला होता कारण हाच बालनागरिक मोठेपणी आपल्या मातृभूमीसाठी शंभरदा मरणार याबद्दल सोव्हिएट संघराज्याला खात्री होती.

मी फिरून आत येऊन दार बंद करून पलंगावर पडलो. आणि लेनिनग्राडचा विचार करू लागलो. सकाळीच मी तेथे पोहोचणार होतो. तेथे जाताच मला प्रा. ततियाना कातेनिया या बाई भेटणार होत्या नि त्यांच्याशी मी मराठी बोलणार होतो. कारण महाराष्ट्रापासून अक्षरशः हजारो मैलांवर मराठी भाषेच्या विकासासाठी, तिच्या वाढीसाठी मराठी भाषा रशियन मुलामुलींना शिकवण्यासाठी धडपडणारी ती बाई उद्याच आपणाला भेटणार याचा मला आनंद झाला होता.

थोड्या वेळात कंपार्टमेंटच्या दारावर टिक् टिक् असा आवाज झाला. मी गडबडीनं दार उघडलं. एक माणूस दारात नम्रपणे उभा होता. त्यानं मला पाहाताच अभिवादन केलं. त्यानं दारात एक मोठी पाटी ठेवली होती आणि त्या पाटीत अनेक प्रकारच्या दारूच्या बाटल्या भरल्या होत्या. त्यानं रशियन भाषेत दारू हवी का म्हणून विचारले. नंतर आपल्याकडे कोणत्या

प्रकारची किती दारू आहे, याची यादी सांगितली. मी मनात हसून नमस्कार करून त्याला वाटेला लावला. नि मनात म्हटलं—जर का तू ही टोकरी-भर दारू घेऊन मुंबईत दिसला असतास तर एकाच क्षणात तुझी वाट लागली असती ! प्रथम तुझी कणीक तिंबली गेली असती. मग तुझ्या मानेवरची ती कोटाची कॉलर पकडून आजपर्यंत जे पाच लाख तुरुंगात गेले आहेत, त्यात तुझी भरती झाली असती. जा. तू रशियात आहेस——

मी डोळे मिटले. झोपण्याचा बेत केला. तोच रेडिओ कडकडला आणि भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंचा आवाज कानी आला. ते राष्ट्र-संघाच्या सभेत भाषण करीत होते . त्यांचं ते भाषण कोणत्या रेडिओनं प्रक्षेपित केलं, ते मात्र समजलं नाही. परंतु तो परिचित आवाज ऐकताच मन भरकन दिल्लीत पोहोचलं आणि मनाच्या वेगापुढं जगातील सर्व वेग निकामी आहेत, याचा त्यावेळी मला प्रत्यय आला.

३. मॉस्को ते लेनिनग्राड

सकाळी लेनिनग्राड येथे अनेक मंडळी आमच्या स्वागतार्थ हजर होती. फुले, कॅमेरा, टेलिव्हिजन, वर्तमान-पत्र–प्रतिनिधी यांनी गर्दी केली होती. त्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रोफेसर ततियानाबाई आपल्या सर्व मराठी विद्यार्थ्यांसह खास मला घ्यायला आल्या होत्या. त्यापूर्वी ओळख असावी तद्वत सरळ माझ्यापुढे येऊन, शुद्ध मराठीत विचारपूस करू लागल्या.

तेव्हा आपण लेनिनग्राडमध्ये नसून मुंबईत असल्याचा मला भास झाला आणि एकापरी तें खरेही होते. कारण माझी 'चित्रा' कादंबरी त्यांच्याच देखरेखीखाली रशियन भाषेत भाषांतरित झाली होती. त्या माझ्याशी मराठीत बोलत होत्या. आणि त्यांच्या विद्यार्थिनी निना नि शश्या ह्या मराठी जपून बोलत होत्या. मी भोवती जमलेली सर्व मंडळी विसरून गुळाला मुंगळा डसावा तद्वत मराठी बोलणाऱ्या रशियन मित्रांत गुंग झालो होतो.

या ततियानाबाई मराठी शुद्ध बोलतात, आणि मराठी बोलताना एखादा शब्द अडला तर—'त्याला काय म्हणतात' म्हणून गंभीर होतात. या वेळी किंचित त्या खिन्न होतात. परंतु इंग्रजी वा हिंदीची मदत न घेता मराठीचाच आधार घेऊन त्या शब्दाची अडवणूक दूर करून हर्षभरित होऊन हसतात. तेव्हा त्यांचा चेहरा आनंदानं फुलतो.

मी भारत सोडण्यापूर्वी आचार्य अत्रे यांनी त्यांना एक पत्र दिले होते मी ते त्यांना दिले. तेव्हा तर त्यांचा आनंद द्विगुणीत झाला. त्यांनी आचार्यांचं पत्र वाचलं आणि त्यात शेवटी प्रणिपात ही अक्षरे मला दाखवून त्यांनी आचार्यांना सादर प्रणाम केला नि म्हणाल्या—तुमचे आचार्य माझे गुरू आहेत. या बाईंनी मराठी-रशियन शब्दकोश तयार केला असून, लौकरच रशियात अनेक लोक मराठी बोलताना दिसणार आहेत.

त्या दिवशीं मी लेनिनग्राड विश्वविद्यालयात गेलो आणि मराठीचा अभ्यास करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांशी चर्चा केली. तेव्हा मला आचार्य अत्रे यांची 'चांगुणा' आणि ना. सी. फडके यांची 'उद्याची बात' या दोन कादंबऱ्या एका टेबलावर दिसल्या. आणि मला हसू आले. मराठीतील ही दोन टोकं त्या लेनिनग्राड नगरात एकत्र आली होती. मी का हसलो याचा गर्भित अर्थ कुणालाच समजला नाही. माझी झाकली मूठ तशीच ठेवली.

लेनिनग्राड शहर मला शांत नि आनंदी वाटले. मॉस्कोची पळापळ

तिथे दिसली नाही. परंतु नगराची रचना भव्य नि सुंदर होती. फुलांच्या ताटव्यातून फूटपाथवरून पुस्तक वाचीत जाणारे तरुण–तरुणी पाहून थोडा हेवा वाटला. लेनिनग्राड शहरामधून वाहणाऱ्या नेव्हा नदीच्या काठानं अनेक चकरा मारून ज्या जहाजावर ऑक्टोबर क्रांतीचा प्रथम ध्वज उभारला ते जहाज पाहून आत्मा शांत झाला.

नंतर आम्ही त्या ऐतिहासिक विंडसर पॅलेसमध्ये मुरकंड दिली. ततियाना कातेनिना ह्या मजबरोबर होत्या. त्या मला प्रत्येक वस्तूचा अर्थ मराठीत समजावून सांगत होत्या. त्यांचे मराठी विद्यार्थी मजबरोबर हिंडत होते. त्यामुळे माझा मराठीचा गोतावळा वाढला होता.

केरेन्स्की सरकारला अटक झालेली खोली आणि प्रथम सोव्हिएट स्थापन झालेले स्थळ पाहून आम्ही कॉ. लेनिन यांच्या खोलीत प्रवेश केला. तेव्हा मन खिन्न झाले. कारण इतकं दूर येऊन तो ऑक्टोबर क्रांतीचा पिता तेथे नव्हता. परंतु त्यांची ती खोली तशीच सजीव होती. ती खोली, खुर्ची, टेबल, टाक, दौत नि त्यांचा तो फोन ह्या सर्व वस्तू पाहिल्या की कॉ. लेनिन आपल्या खोलीत विश्रांती घेत असल्याचा भास होतो आणि मन धावतच आतल्या खोलीत शिरते. परंतु तिथ कॉ. लेनिन दिसत नाहीत. त्यांचा तो पलंग एकटाच त्यांची वाट पाहात असल्याचे पाहून मन काळवंडते. डोळे भरून येतात नि कॉ. लेनिनची खोली पाहिली यातच समाधान मानावे लागते.

खरे म्हणजे रशियन माणूस हा इतिहासप्रिय आहे. जुना इतिहास तो जतन करतो. नवा निर्माण करतो आणि तो नवा इतिहास डोळयांत तेल घालून जपतो. याची मला येथे प्रचीती आली.

लेनिनग्राड शहरापासून काही अंतरावर एक उद्यान आहे. त्याचे रशियन नाव मला आठवत नाही. मी त्याला शांतिउद्यान म्हणत होतो. एकोणीसशे बेचाळीस साली नाझी आक्रमकांनी लेनिनग्राडला वेढा दिला तेव्हा उपास-

मारीने आणि लढाईत जे हजारो नव्हे लाखो लोक मरण पावले त्यांचे ते एक महान स्मारक आहे. कडेवर मूल घेऊन एक स्त्री उभी असून, समोर कॉ. लेनिन उभे आहेत. मागे दगडावर लेनिनग्राडसाठी मरणाऱ्या वीरांची नावे कोरली आहेत. फुलझाडांच्या ताटव्यात चार फूट उंचीचे चबुतरे उभे असून, त्यांवर फक्त 'एकोणीसशे बेचाळीस' अशी अक्षरे दिसत आहेत आणि पहिल्याच प्रवेशद्वाराजवळ एक अग्निकुंड धगधगत आहे. ती आग आज कित्येक दिवस जळत असून, जगाच्या अंतापर्यंत जळणार आहे. ती आग म्हणजे महान लेनिनग्राडसाठी, रशियन भूमीसाठी, समाजवादासाठी ज्यांनी प्राण अर्पण केले त्यांची स्मृती आहे.

त्या उद्यानात हजारो लोक फुले घेऊन येतात आणि त्या अग्निकुंडापुढें उभे राहून 'तुम्ही ज्याकरिता मेला, त्यासाठीं आम्ही जगत आहोत,' असेच जणू म्हणत असल्याचा भास होतो.

कित्येक म्हातारी माणसं त्या अग्निकुंडासमोर उभे राहून छातीवर क्रूसाची खूण करताना मला दिसली. तिथे गेले की माणसाला थट्टामस्करी आठवत नाही. युद्धाची चीड, युद्धाचा द्वेष यांत माणूस गुरफटून जातो. कारण लेनिनचे नाव धारण करणाऱ्या त्या नगराला नाझींचे पाय लागू नयेत म्हणून ज्या लाखोंनी प्राण अर्पण केले, त्यांचे ते महान स्मारक आहे. म्हणूनच ते उद्यान, ती आग डोळ्यांपुढून हलत नाही. जी युद्धविरोधी आग आज रशियन मानवाच्या हृदयात अखंड जळत आहे, त्याचे ते उद्यान म्हणजे एक प्रतीकच आहे.

नंतर आम्ही लेनिनग्राडचे म्युझियम पाहिले. तिथं हजारो वर्षांच्या वस्तू सलामत आहेत. श्रीमती टी. कातेनिना या मला प्रत्येक वस्तूविषयी मराठीत समजावून सांगत होत्या. सम्राट चंद्रगुप्तापासून आजपर्यंतची सर्व भारतीय नाणी मला तेथे दिसली. खास मराठी तरवार नि पट्टा ही हत्यारं त्या ठिकाणी पाहून आश्चर्य वाटले. याच ठिकाणी टिपू सुलतान यांची एक

तरवारही आहे.

याच नगरात मला कॉ. पी. ए. बारनिकोव भेटले. माझे दुभाषी म्हणून त्यांची योजना झाली होती. यांनी तुलसीरामायणाचा गद्यात रशियन अनुवाद केला असून, तो आता छापत आहे. ते हिंदीचे पंडितच आहेत. ते माझे दुभाषे म्हणून जेव्हा माझ्याबरोबर निघाले तेव्हा मला आनंद झाला. हे बारनिकोव सावलीसारखं माझ्या मागे असत. मी हिंदीत शब्द उच्चारताच त्याचा रशियन अनुवाद होई आणि आपण रशियन बोलत असल्याचा मला भास होई.

तारीख एकवीस रोजी स्टालिनग्राडला जाण्यासाठी तारीख वीस रोजी आम्ही मॉस्कोत दाखल झालो. तेव्हा कॉ. बारनिकोव हे माझ्या मागेच होते.

मॉस्कोत 'सोविएट स्काय' हॉटेलात शिरताना मला एक ओळखीचा गृहस्थ भेटला. त्यानें मला अडवून विचारले :

'तुम्हाला रशियन येतं ?'

'नाही.' मी उत्तर दिले.

'मग भाषेची मोठी अडचण आहे,' असे म्हणून त्याने माझी कीव केली आणि मी म्हणालो—

'मला भाषेची मुळीच अडचण नाही—'

माझ्या या बोलण्याने तो इसम चमकला. म्हणाला,

'तुम्हाला रशियन कळत नाही आणि भाषेची अडचणही नाही, याचा अर्थ—?'

तेव्हा मी म्हणालो,

'माझ्याकडे दोन जिभा असून, त्यांपैकी एक हिंदी आहे नि दुसरी रशियन आहे. जी हिंदी जीभ आहे, ती माझ्याजवळ असून, रशियन जीभ मी कॉ. बारनिकोव यांच्याकडे दिली आहे.—' हा माझा भयंकर खुलासा ऐकून तो इसम कावराबावरा झाला नि हसू लागला. रशियन

माणूस विनोदप्रिय असल्याचे मला त्यावेळी कळून आले.

दिनांक वीस रोजी मॉस्को पाहणे, लेखक संघाला भेट देणे नि रात्री एका जाहीर सभेला हजर राहाणे एवढीच कामे होती. आम्ही मॉस्को पाहात पाहात शेवटी काही वस्तू खरेदी केल्या. मी काही खेळणी घेतली आणि एक कॅमेरा घेतला. टॅक्सी केली आणि बारनिकोवला घेऊन लेखक संघाकडे गेलो. दारात टॅक्सी सोडली. आणि त्या टॅक्सीतून माझा कॅमेरा पळाला हे मला कळले नाही. अर्ध्या तासानंतर मला उमजले की कॅमेरा नि खेळणी गेली. मग धावपळ झाली. परंतु सोविएत देशात टॅक्सीचे खास रेडिओ स्टेशन असून, बहुतेक टॅक्सीत रेडिओ, फोन असतो. आम्ही लगेच टॅक्सी रेडिओला फोन केला. तेव्हा उत्तर आले की, रात्री नऊ वाजता तो कॅमेरा ' सोविएत स्काय ' हॉटेलावर येईल. आणि याच वेळी टॅक्सी ड्रायव्हर तो कॅमेरा घेऊन माझ्याकडे धावत आला. त्याला अजून रेडिओने कळवले नव्हते. तो कॅमेरा घेऊन मी सुटकेचा निःश्वास टाकला. माझ्या दृष्टीनं तो प्रकार मोठा नाट्यमय असाच होता. तो माझ्या मनावर कोरला गेला. रशियन माणूस यंत्राचा गुलाम नसून यंत्रच त्याच्या अधीन आहे.

आणि जेंव्हा मी दुसऱ्या टॅक्सीतून मैत्रीभवनाकडे निघालो, तेव्हा टॅक्सी रेडिओ सांगत होता. " तवारीश ——८०८३ भारतीय पाहुण्याचा कॅमेरा ' सोविएत-स्काय ' हॉटेलात पोचवा. " त्या वेळी तो कॅमेरा माझ्या गळ्यात होता. आणि याच वेळी कॉ बारनिकोव यांनी अनुवादित केलेले रामायण फरारी झाले होते. त्यामुळे बारनिकोव बेचैन होऊन टॅक्सीतून उडी मारण्याचा विचार करीत होते आणि भारतीय तुलसीरामायण मॉस्कोत बेपत्ता झालेले पाहून मी पोट धरून हसत होतो.

४. लाल ताऱ्याखाली

चौदा सप्टेंबर एकोणीसशे साठच्या सकाळपासूनच मॉस्को शहरात माझा फेरफटका सुरू झाला होता. आपला तो साहेबी पोशाख मी दुडमडून कपाटात कोंबला होता. आणि सिल्कचा सदरा, पायजमा, कोल्हापुरी जरीच्या वाहणा, अशा देशी थाटात गॉर्कीरोड या विशाल राजपथानं चालत होतो.

समाजवादाचे यश नि मॉस्कोची माणसं कशी आहेत ? या दोन प्रश्नांची

उत्तरं मी शोधीत होतो. भव्य राजमार्ग, रेखीव इमारती, माळेत मोती ओवल्याप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा उभी असलेली झाडं आणि तीही एका जातीची, एका वयाची आणि समान उंचीची. मध्ये फूटपाथ. त्यांच्या आत फुलझाडांचा सुंदर ताटवा. तोही मैलच्या मैल लांबीचा. हे सारे पाहून नि पल्लेदार, स्वच्छ, आरशासारखे रस्ते पाहून मॉस्कोचे वैभव त्या रस्त्यावर नम्र उभे असल्याचा भास झाला नि डोळे फुलपाखराने एखाद्या बागेत भिरभिरावे तसे नाचू लागले.

तेथे ठायी ठायी सिगारेटची राख टाकण्याची सोय आहे. पाहावे तिथे सुंदर कुंडी उभी असते नि ती कुंडीही मॉस्कोची शोभा वाढवते. आजूबाजूला सिगा-रेटचे थोटूक, जळकी काडी, यांपैकी काहीच दिसत नव्हते किंवा कागदाचा कपटा किंवा चिमूटभर धूळ तिथं मिळणे मुष्कील आहे. मी त्या वस्तू पाह-ण्याची खटपट करीत होतो नि त्याच मला सापडत नव्हत्या. कारण जळकी काडी त्या रस्त्यावर टाकायची नाही, असा मॉस्कोच्या माणसांनी पणच केला आहे. जी माणसं आपल्या राजमार्गावर इतकं प्रेम करतात ती आपल्या देशावर किती प्रेम करीत असतील, याची कल्पनाच करवत नाही !

ज्यानं दलितांचे साहित्य नि साहित्यिक निर्माण केले आणि जो सोविएत साहित्याचा पितामह मानला गेला त्या महान गॉर्कीचं नाव धारण करणारा तो गॉर्कीपथ गॉर्कीइतकाच भव्य आणि निर्मळ दिसत आहे. आजही तो आपल्या मॉस्को नगरीची शोभा द्विगुणित करीत आहे.

रशियात कलावंताला किती मान आहे, याची तर तिथं पदोपदी प्रचीती येते. रशियन महान साहित्यिकांना रशियन लोकांनी अजरामर करून ठेवले आहे. कित्येक मार्गांना, चौकांना, कलावंतांची नावं दिली आहेत नि त्यांचे भव्य पुतळे उभे केले आहेत. त्यांचं साहित्य आणि इतिहास या दोन गोष्टी अगदी हातात हात घालून जागोजाग उभ्या आहेत. टॉलस्टॉय, पुष्कीन गॉर्की, मायाकोवस्की, ही नावं सजीव झाली आहेत.

मॉस्को शहरात मला एक मोठा पेंच पडला. आणि तो म्हणजे त्या माणसांची धावपळ. ही माणसं अशी पळतात का ? ती सुंदर, नम्र आणि शहाणी माणसं सारखी पळत होती ! धाव धावून रस्ते ओलांडीत होती. त्या पळण्यात कष्ट नव्हते. जबरी नव्हती. तर उत्साह ओसंडत होता. पण त्या पळण्याचं मला कारण कळत नव्हतं. म्हातारे, तरुण, मुलगे, मुली सारेच पळताना दिसत होते. आणि त्याचं कारण हुडकीत मी फिरत होतो.

मॉस्कोचे रस्ते ओलांडताना मीही मॉस्को नागरिकांच्याप्रमाणें धावू लागलो. आणि ते पाहून चाणाक्ष मंडळी गालात हसू लागली. परंतु पळताना माझी परिस्थिती नाजूक होत असे. कारण मॉस्कोत सर्व वाहने उजवीकडून चालतात. मला डावीकडून चालणे ठाऊक ! त्यामुळे घोटाळा होत होता. परंतु गॉर्की मार्गावरची वाहतूक नियंत्रण करणारे पोलीस दोन्हीकडची वाहतूक बंद करून मला मार्ग देत. कारण मॉस्कोच्या राजपथावर मी स्वर्गवासी होण्याचा संभव अधिक होता. शिवाय मी त्यांचा पाहुणा होतो.

काही खवचट मॉस्कोकरांनी ' तुम्ही का पळता ? ' असा प्रश्न विचारला आणि मी खवचट उत्तर दिले --' तुमची एखादी मोटार मोडेल म्हणून मी पळतोय--'

सतरा सप्टेंबरला आम्हांला भारतीय वकिलातीने पार्टी दिली. त्याच वेळी जागतिक युवक संघटनेची मॉस्कोत सभा होती. त्यामुळे अनेक देशांचे युवक त्या पार्टीला हजर होते. भारतीय वकिलातीने दखल घेतली आणि श्री. थान यांनी आमची विचारपूस केली तेव्हा बरे वाटले.

पहिल्याच दिवशी मॉस्कोत मला एक मित्रलाभ झाला. त्याचे नाव लिओनिद. हा उत्तम फोटोग्राफर आहे. सहा फूट उंची, गोरा रंग, सुदृढ देह, तरतरीत चेहरा, पाणीदार निळे डोळे. अंगात सुंदर कपडे, वर करड्या रंगाचा ओव्हरकोट, खांद्याला बॅटरी, गळ्यात कॅमेरा अशा

थाटात लिओनिद मला भेटला नि त्याच क्षणी माझा मित्र झाला. आम्हा दोघांनाही पोटापुरतं इंग्रजी येत होतं. आणि इंग्रजीची वाट अडली की आम्ही कथकली पद्धतीच्या खुणा करून मार्ग काढीत होतो. जेव्हा आम्हांवर खुणा करायची पाळी येई, तेव्हा आम्ही मुक्याप्रमाणे खुणा करून स्वतःच हसत होतो.

मॉस्कोत मला जे मित्र मिळाले, त्यात फोटोग्राफर, मोटार ड्रायव्हर, बागेत काम करणारे, हॉटेलमधील मुली, लिफ्ट चालवणाऱ्या वृद्ध बाया आणि अशा या मित्रांकडूनच मला रशियन माणसांचा आत्मा समजला.

प्रथम मॉस्कोची माणसं पळतात का, या प्रश्नाचा निकाल लागला. त्यासाठी मी अनेक पळणारांच्या पाठी पळून, त्यांना अडवून, त्या पळण्याचे कारण विचारले. कित्येकांना समोर पाहून अडवले. अगदी सर्व वयाच्या व्यक्तींना रोखून आपला प्रश्न विचारला.

'तुम्ही पळता का ?'

आणि त्या चाणाक्ष माणसांनी हसत उत्तर दिले. त्या उत्तरामधून एक अर्थ निष्पन्न झाला की—

'आम्हाला आमची सप्तवार्षिक योजना लवकर पूर्ण करायची आहे.'

हे कारण ऐकून मी चकितच झालो. ती सुंदर, नम्र, सभ्य माणसं विचारीही आहेत, हे मला कळून चुकलं. समाजवादाचे यश त्या जनतेच्या विचारात अगदी खोल आहे. तिथं प्रत्येक मानव आपलं पाऊल देशहितार्थ टाकीत आहे. त्याला भविष्याची आस लागली आहे. तो सुखासाठी, शांततेसाठी, एकही क्षण वाया दवडीत नाही. म्हणून नम्रता, सभ्यता, तिथे फुलाप्रमाणं फुलत आहे. सुखाचा सुगंध सर्वत्र दरवळत आहे.

या जनतेनं गेल्या चाळीस वर्षांत अपार त्याग केला आहे. रक्त, अश्रु नि घाम गाळून समाजवादाची प्रतिष्ठा वाढवली आहे नि ती राखली आहे.

ती जनता रणात रणपंडित आहे. आक्रमकाच्या गुहेंत शिरून त्याचा तिने चुराडा केला आहे. पण तो रणात. एरव्ही ती जनता शांतताप्रेमी आहे.

लिओनिदच्या खांद्यावर हात टाकून मी लाल चौकातून क्रेमलिनकडे जात होती. मी तोंडात सिगारेट धरली होती, पण खिशात काडी नव्हती. म्हणून तशीच सिगारेट ओठात दाबून ढेंगा टाकीत होतो. पुढून एक गृहस्थ आला. त्यानं जवळ येताच फरकन् काडी ओढून माझ्या सिगारेटला लावली. असं होईल, याची मला मुळीच कल्पना नव्हती.

' तुम्ही भारतीय ? ' त्या गृहस्थानं विचारले. आणि त्याचे आभार मानून मी हो म्हणताच तो गळ्यात पडला, म्हणाला-–

' तुमचे नेहरू कसे आहेत ? '

' अगदी ठणठणीत. ' मी उत्तर दिलं, ' ते आज यूनोत बोलत आहेत--'

हे ऐकून तो हर्षभरित झाला. तो नेहरूंना धन्यवाद देत निघून गेला. सोविएत देश म्हणजे नेहरूंवर प्रेम करणारांचा देश आहे. तिथे नेहरूंविषयी नितांत आदर आहे.

लाल चौकाच्या वरच्या बाजूस एक जुने चर्च आहे. त्याची स्थिती खंबीर असून, ते लाल चौक आणि क्रेमलिन यांची शोभा वाढवीत आहे. कित्येक भाविक त्यात जातात. काही मंडळी त्या चर्चकडे पाहून आपल्या छातीवर क्रुसाच्या खुणा करताना मी पाहिली. यावरून तिथं भाविकांच्या भावना मुक्त आहेत.

मी चालत चालत लिओनिदला प्रश्न केला,

' तुमचं वय किती ? '

' एकवीस—' त्यांनी उत्तर दिलं.

' काम काय करता ?'

' फोटो--' असं म्हणून त्यानं कॅमेरा पुढे केला.

' वडील काय काम करतात ? ' या माझ्या प्रश्नानं तो गंभीर झाला.

हृदयात कळ उठावी तसा तो दिसू लागला. त्याच्या हसऱ्या निळ्या डोळ्यात विलक्षण गंभीर भाव तरळला. तो मोजक्या शब्दात म्हणाला.

'सातेजी, माझे वडील सोविएत देशाचं रक्षण करता करता आघाडीवर मारले गेले—'

'गेल्या महायुद्धात?' मी विचारले आणि त्यानं मानेनं होकार दिला. त्यावेळचा त्याचा तो चेहरा नि त्यावरचा तो भाव पाहून माझं अंत:करण भरून आलं.

'तर मग तुम्ही वीरपुत्र आहात—' मी उद्‌गारलो आणि लिओनिद हसला. वडील मारले गेले, तेव्हा माझा मित्र तीन वर्षांचा होता. आपला जन्मदाता कसा होता, हे त्याला ठाऊक नव्हते. आता वडिलांचा फोटो पाहून त्याला पितृदर्शन घडते.

'लग्न झालंय का?' मी त्याची गंभीरता एकदम उडवून दिली आणि माझा हेतू सफल झाला. स्वारी खुदकन हसून उत्तरली.

'लग्न झालं नाही, पण लौकरच होणार आहे—'

'म्हणजे निश्चित झालं आहे?'

'नक्की झालं आहे—' तो म्हणाला, 'थोड्याच दिवसांत मी चतुर्भुज होणार—'

'तुझी भावी पत्नी कशी आहे?' मी मुद्दाम विचारले आणि तो आनंदानं मोहरला. बोलू लागला,—'सातेजी, माझी पत्नी फार फार सुंदर आहे, तशीच ती गुणी आहे. माझं भाग्य थोर म्हणूनच ती मला मिळाली आहे......'

त्याच्या शब्दांतून निर्मळ गंगा वाहत होती. कृत्रिमपणाचा लवलेश नव्हता. तो अंत:करणापासून आपल्या भावी पत्नीचं वर्णन करीत होता. त्यावरून त्याच्या मनाची मला कल्पना आली आणि तो बोलतच होता—

'तिच्याविषयी मी शब्दानं सांगू शकत नाही—'

'पुरे, पुष्कळ सांगून टाकलेस--' मी त्याची थट्टा केली. रशियन तरुणांत वैफल्य आलं असून, त्यांच्यांत लैंगिक विकृती बोकाळली आहे, असा काही महाभाग आरोप करतात. त्याला लिओनिद लाल चौकात जणू उत्तरच देत होता.

'खरंच, तुझ्या भावी पत्नीवर तुझं प्रेम आहे ? ' हा माझा प्रश्न ऐकून पुन्हः तो गंभीर झाला आणि गप्पकन आपल्या हृदयावर हात ठेवून 'होय' म्हणाला.

रशियन तरुण प्रेमाला फारच पवित्र मानतो. मंगल मानतो. त्याची साक्ष तो हृदयावर हात ठेवून देतो आणि दुसरी कसली शपथ हवी आहे ? हृदय हेच सर्वात पवित्र असतं. हृदय हाच देव आहे रशियात.

' फोटोग्राफी करून तुमचा संसार चालणार का ?' हा प्रश्न ऐकून तो हसत सुटला. माझी कीव करीत म्हणाला,

' इथं समाजसत्तावाद आहे नि त्यानं आम्हांला जगण्याची शाश्वती दिलेली आहे, हे तुम्ही विसरता सातेजी--'

शेवटी घात झालाच. आपलं अज्ञान उघड होऊ नये म्हणून मी फार काळजी घेत असता वरील प्रश्न विचारून चूक केली. पुन: तशी चूक करायची नाही, असा मी त्याच जागी निश्चय केला.

मॉस्कोत मी आपलं पहिलं भाषण मराठीत केलं तेव्हा दोन दुभाषे माझ्या मागे उभे होते. मराठीचं इंग्रजी नि इंग्रजीचं रशियन होऊनच ते श्रोत्यांच्या कानांत शिरणार होतं. शिवाय पुढं बसलेले श्रोतेही बडी मंडळी होती. मी मराठीत बोलणार हे ऐकून त्यांनाही आनंद झाला नि मी आरंभ केला.

'कदाचित मराठीत होणारे हे भाषण ऐकण्याची तुम्हावर ही पहिलीच वेळ आली असावी. परंतु भारतात महाराष्ट्र हे एक राज्य आहे. त्या राज्यात साडेतीन कोटी लोक मराठी बोलतात नि ती माणसं तुमच्यासारखीच नेक,

झुंझार आहेत. तुमचा अफानासी भारतात गेला होता, पण त्याचं पहिलं पाऊल माझ्या मराठी धरणीवर, महाराष्ट्र राज्यात, शिवाजी राजांच्या मातृभूमीत पडलं होतं–त्या राज्याच्या मराठीत मी बोलतोय् ....'

भाषण संपताच माझ्यावर माणसांची नि कॅमेऱ्यांची मुरकंड पडली. याच गर्दीत मला एक प्रोफेसर एव्गेनी चेलिशेव भेटले. ते आता शिवाजीमहाराजांचं चरित्र रशियन भाषेत लिहीत आहेत. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राची एक सफर केली आहे. ते उत्तम हिंदी बोलतात. पुणे शहराच्या बऱ्याच गल्ल्या त्यांच्या ओळखीच्या आहेत. सदाशिव शनिवार, शिवाजीनगर ही पुण्यातील नावं ते उच्चारू लागले. तेव्हा माझी, पाचावर धारण बसली. जर या प्रोफेसर महाशयांनी मला जिलब्या मारुतीची खुशाली विचारली तर मी काय सांगू ? या विचारानं माझा चेहरा एकदम पडला आणि मी विषयाला कलाटणी दिली. जेव्हा त्यांनी मला शिवाजीमहारांविषयी काही प्रश्न विचारले, तेव्हा मी म. म. पोतदार, प्रा. न. र. फाटक, आचार्य अत्रे ही नावं पुढं करून स्वतःचा बचाव करून घेतला आणि त्याच वेळी मला कळून चुकले की हे मॉस्कोचे नागरिक विचारानं मुंबई, पुणे, दिल्ली या आपल्या शहरातच वावरत आहेत. त्यांनी लो. टिळक, पं. नेहरू यांची चरित्रं प्रकाशित केली असून, लौकरच शिवाजीमहाराजांचं चरित्रही ते प्रकाशित करणार आहेत. टागोरसाहित्य तर सर्वत्र वाचलं जातं. रामायण, महाभारत या ग्रंथांचा पूर्वीच अनुवाद झाला आहे.

अशा मानवांत हिंडताना, त्यांच्याशी बोलताना, जो आनंद प्राप्त होतो, जो विनोद अवतरतो, तो अनुभवण्यासाठी मॉस्कोतच जावे आणि त्या लाल ताऱ्याखाली उभं राहून तो आनंद लुटावा. तसं भाग्य मला लाभलं. म्हणूनच मी त्या लाल ताऱ्याखाली उभा राहून तो आनंद अनुभवला.

५. बाकूकडे

स्टालिनग्राडकडे पाहून आम्ही अजर-बैजानची राजधानी बाकू या शहराकडे निघालो होतो. सकाळी सात वाजता विमान उडालं होतं नि तब्बल दिवस-भर ते आकाशातून भ्रमण करणार होते. मी खिडकीजवळ बसून धरणी पाहात होतो. परंतु ढगाच्या पडद्यातून तिचं दर्शन होत नव्हतं.

शिष्टमंडळाचे एक सभासद चतर्जी झोप काढीत होते. दुसरे पुष्कराज

भट प्रभावीत होऊन सोविएत देशावर चर्चा करीत होते. डॉ दयाळू आराम करीत होते. कॉ. बारनिकोव काहीतरी वाचत होते. मद्रासचे जेकब जीम उठून माझ्याशेजारी येऊन बसत म्हणाले,

'साठेजी, पालम विमानतळावर तुम्ही दिसला तेव्हा, हा माणूस मूर्ख असावा असा आमचा अंदाज होता पण ती चूक होती, असं आता सिद्ध झालं आहे. कारण या देशात तुमचा गोतावळा मोठा असून, खरच तुम्ही लेखक आहात यात शंकाच नाही. शिवाय तुमची भाषणंही अगदी फायरब्रँड होतात, त्यानं मला फार फार आनंद होतोय. परंतु माझा गिटार बेपत्ता होणार हे तुमचं भाकित बरोबर नाही--'

मी म्हणालो,

'हा सोविएट देश आहे. इथं अशक्य असं काहीच नाही. शिवाय हा माणसांचा देश आहे. जिथ रामायण फरारी होतं, तिथं गिटार काय करणार--'

हे ऐकून जेकबचा चेहरा पुन्हा उतरला. तो म्हणाला,

'ठीक आहे, पण गिटार गेल्याचा आनंद तुम्हांला मिळणार नाही--' असं म्हणून त्यांनी आपल्या गिटारवर नजर टाकून नतर डोळे झाकले.

आणि माझ्या डोळयांपुढं प्रसंग तरळू लागले. आपण रशियात काय काय पाहिलं, याची एक मालिकाच डोळयांपुढून सरकू लागली.

रशियात मी नवी सृष्टी पाहिली. एक नवा समाज पाहिला. समाजवादाच्या सावलीस वाढलेली मुलं नि फुलं पाहिली. जर मी सोविएत देश पाहिला नसता तर माझ्या जीवनात एक फार मोठी पोकळी राहून गेली असती.

मी अनेक शाळा—कॉलेजं नि विश्वविद्यालयं पाहिली. अनेक विद्यार्थ्यांशी बोललो. मला अनेक मास्तर भेटले. मी दवाखाने पाहिले आणि सामुदायिक शेतीही पाहिली. या दरम्यान मला अनेक नवे अनुभव आले. एका शाळेत मला एक शिक्षक भेटला. तो दिसण्यात भोळा दिसला. त्याला मी

सहज प्रश्न केला.

'तुमच्या देशात निरक्षरतेचे प्रमाण किती आहे ?'

तेव्हा तो भोळा दिसणारा शिक्षक गंभीर मुद्रा करून म्हणाला,

'असेल की सात टक्के-- '

'हे सात टक्के अडाणी का राहून गेले ?' मी दुसरा सवाल टाकला आणि ते महाशय आपली गंभीरता वाढवून म्हणाले,

'हे सात टक्के लोक अडाणी आहेत त्याचं कारण त्यांना चालता येत नाही. काही लोक पाळण्यात आराम करीत आहेत तर काही आईच्या पोटात आहेत--'

हा जबर खुलासा ऐकून मी चाट पडलो नि एकदम हसत सुटलो, पण खरं म्हणजे माझी चूक झाली होती. याची जाणीव होताच माझा नूर पालटला. मी म्हणालो, 'अहो, मी थट्टा केली--'

ते गृहस्थ नम्रपणे म्हणाले, 'मग मी काय म्हणतोय, मीही थट्टा केली.' मग आम्ही दोघेही खूप हसलो. अगदी मनमुराद हसलो.

रशियात शिक्षणाची नदीच वाहात आहे. आणि माणसांना विद्येचं वेड लागलं आहे. म्हणूनच प्रगतीन त्यांचा पदर धरला आहे. फुलं, मुलं, फळं नि माणूस समान पातळीवर असून तिथं जीवनात मुळीच विसंगती उरली नाही.

मुक्त माणसं, स्वायत्त माणसं आणि कष्टाळू माणस यांचा तो देश आहे. तिथं दारिद्र्य नावाला उरलेलं नाही. चाळीस वर्षांत समाजवादानं त्या देशात अमरापुरी निर्माण केली आहे. ती नवी दुनिया सारखी फुलत आहे. रोज तिला नवा बहर येत आहे.

घरातील घाण ऐन रस्त्यावर आणून ओतणारा त्या देशात एकही नाही. एवढेच नव्हे तर रस्ते म्हणजे आपले वैभव समजून त्यावर जळकी काडी देखील ते लोक टाकीत नाहीत. देशातील प्रत्येक वस्तू त्यांच्या मालकीची आहे.

म्हणूनच ते तिची काळजी घेत असतात. मॉस्कोतील गॉर्की मार्गावर घाण करणे म्हणजे देशाची अप्रतिष्ठा करण्याचे पाप समजले जाते. स्टालिनग्राड येथील स्मारकाविषयी अपउच्चार काढणे त्यांना रुचत नाही. कॉ. लेनिन आणि स्टालिन ही नावं त्यांना फार फार प्रिय आहेत. ते त्यांचे वीर पुरुष आहेत. लेनिन हे नाव ते फार जपून उच्चारतात.

मी जर रशियन प्रगतीचे आकडे जमवले असते तर मला वाटते, एक डोंगरच उभा झाला असता. म्हणून आकड्यांची वाट धरली नाही. फक्त पाहात होतो. जपून बोलत होतो. मी समाजवादाचं यश पाहात होतो नि अपयशही हुडकीत होतो. ऐश्वर्याबरोबर दारिद्र्येही मी शोधित होतो. परंतु मला ते दारिद्र्य दिसत नव्हते. दारिद्र्य हे दडत नसतं.

एखादी लबाड सत्ता डोंगराएवढे सत्य दडवू शकेल. परंतु तिला दारिद्र्य हे मुळीच दवडता येणार नाही. असं माझं मत आहे नि ते खरे आहे; असा माझा दावा आहे.

कारण दारिद्र्य हे फार क्रूर असते नि ते नग्न असते. त्याच्या खुणा माणसाच्या मनावर, हृदयावर नि चेहऱ्यावर शुद्ध उमटलेल्या दिसतात. त्या दडणे शक्यच नाही. शिवाय दारिद्र्याच्या त्या खुणा माणसाच्या वस्त्रावर उमटलेल्या असतात. त्या म्हणजे कपड्यावरची जुनी ठिगळं नि फाटक्या कापडांना घातलेले टाके ह्या होत. मला वाटते, या खुणा कुणीच दडवू शकणार नाही.

मी रशियात या खुणा पाहण्याची पराकाष्ठा करीत होतो, परंतु अखेर-पर्यन्त मला ठिगळं लावलेले कापड कुणाच्या अंगात दिसले नाही. म्हणूनच मी निर्भयपणे सांगू शकतो की, सोविएट संघ राज्यात दारिद्र्याचे नावही उरलेले नाही. महान ऑक्टोबर क्रांतीनं तो क्रूर शब्दच तिथं जाळून टाकला आहे. म्हणूनच त्यांच्या प्रगतीची भरारी गगनाला भिडत आहे.

मी पुतळे, शाळा अनेक व बागा पाहिल्या. मला सर्वत्र शिक्षण दिसले.

आगोजाग जे पुतळे उभे आहेत, ते सुद्धा एक प्रकारे शिक्षणच देत आहेत. निकामी वस्तूंचे तिथे विनाकारण प्रदर्शन केलं जात नाही. असंच माझं मत झालं. त्या देशात प्रत्येक वस्तू म्हणजे जीवनाचा अलंकार असते.

बाकूकडे निघालेले आमचे विमान जेव्हा कास्पियन समुद्रावर आलं, तेव्हा मी खाली पाहिलं. सारी धरणी हिरवी असावी तसं दृश्य दिसलं आम्ही कास्पियन समुद्र ओलांडला आणि बाकू आल्याची वर्दी मिळाली. पट्टा लावा अशी लाल पाटी दिसू लागली. तो संपूर्ण दिवस आम्ही विमानात म्हणजे आकाशात काढला होता. अंतराळातील अखंड दाबानं डोकी सुन्न झाली होती आणि भलताच थकवा आला होता. केव्हा एकदा या विमानातून बाहेर पडतो, असं सर्वांनाच झाले होते. अगदी कंटाळा आला होता.

विमान उतरताच आम्ही मुरकंड देऊन बाहेर पडलो. त्यावेळी आजर-बैजानी मित्र फुलं घेऊन स्वागतासाठी आले होते. त्यात बडी मंडळी, वर्तमानपत्र प्रतिनिधी, रेडिओ, टेलिव्हिजन आणि फोटोग्राफर यांनी नुसती एकच गर्दी केली होती. सर्वत्र एकच गडबड उठली आणि या गडबडीत मद्रासचे जेकब आपलं गिटार विसरून मोटारीत बसले. बाकू शहरापर्यन्त गिटार गेल्याचे कुणाच्याच लक्षात आले नाही.

आणि जेव्हा गिटार गेले ही गोष्ट जेकबला समजली, तेव्हा तो भलताच दु:खी झाला. परंतु त्याला जे दु:ख झाले ते गिटार गेले म्हणून नव्हे तर माझे भाकित खरे ठरले म्हणून. तो झाकली मूठ झाकून गप्प बसला. त्यानं गिटारचं नावच काढलं नाही नि काढले तेव्हा मला कळू नये, याची खबरदारी घेऊनच हालचाल केली.

मग गिटारची शोधाशोध सुरू झाली. विमानतळाकडे मोटारी पळाल्या. फोन केले. तेव्हा गिटार घेऊन ते विमान मॉस्कोकडे दूर गेले होते.

दोन दिवसांनं गिटार परत बाकूला आलं तेव्हा जेकबला आनंद झाला आणि सोविएत संघराज्याच्या योजनाबद्ध व्यवहाराचे मला आश्चर्य वाटले.

या दरम्यान कॅमेरा, पेन, रामायण नि गिटार या वस्तू हरवल्या आणि परत सापडल्या. यावरून सोविएत देशातील माणसं किती व्यवहारदक्ष आहेत, याची कल्पना आली.

आजरबैजानचे वातावरण, रीतीरिवाज किंचित अवळजवळचे भासले. काही शब्दपूर्वी ऐकल्यासारखे वाटले. आणि आपण आपल्या भारताच्या समीप आहोत, असा भास झाला.

हे आजर बैजान सोविएट संघराज्यातील पंधरा घटक राष्ट्रांपैकी एक असून, ते आशिया खंडातील एक मुस्लीम राष्ट्र आहे. परंतु समाजवादानं ऑक्टोबर क्रांतीनं त्याचे जीवनच बदलून टाकले आहे. म्हणजे आजरबैजान आज ऐश्वर्याच्या कळसावर आहे. इथं लेनिनला तर आपल्या सोविएट संघराज्याचा नि ऑक्टोबर क्रांतीचा पितामह मानतात आणि कॉ किरोव याचेवर हे लोक फार फार प्रेम करतात. कारण त्यांच्याच खटपटीनं पहिला ट्रॅक्टर आजरबैजानमध्ये आला आणि या राष्ट्राच्या प्रगतीला आरंभ झाला कॉ. किरोवबद्दल या लोकांत फार फार आदर आहे.

आज तिथ प्रत्येक माणूस मुक्त नि स्वतंत्र आहे. तो 'हम आझाद हैं' असं गर्वानं सांगतो आणि त्याचा तो गर्व रास्त आहे.

बाकू विमानतळावर पाय ठेवताच मला हमीदसाहेब भेटले नि लगेच माझे मित्र झाले. अठरा वर्षांपूर्वी मी स्टालिनग्राडच्या संग्रामावर पोवाडा लिहिला असून, मी कामगार आहे या दोन गोष्टींमुळे त्यांचा माझ्यावर जीव जडला आणि ते मला 'शाहीरे अझीज' अशी हाक मारू लागले. ही त्यांची हाक मी जन्मात कधीही विसरू शकत नाही. कारण त्यांच्या हाकेत जगातील सर्वश्रेष्ठ नि मंगल भावना सामावली होती.

६. संपन्न बाकू

सोविएत संघराज्यात बाकू शहराचा चौथा क्रमांक आहे. पहिले मॉस्को, दुसरे लेनिनग्राड, तिसरे खार्कोव नि चौथे बाकू असा तो क्रमांक लागतो. आम्ही पोहोचलो त्याच रात्री नऊ वाजता हमीदसाहेब (माझे अझिज) येऊन म्हणाले,

'चला थोडं बाकू पाहून येऊ—'

बाकूतील आल्हाददायी वातावरणात आमचा थकवा केव्हाच दूर झाला होता. आम्ही लगेच निघालो.

बाकू शहराच्या पुढे कास्पियन समुद्र नि मागे एक उंच टेकडी आहे आणि त्या टेकडीवर कॉ. किरोव यांचा भव्य पुतळा समुद्राकडे हात रोखून उभा आहे. जणू ते भाषण करीत आहेत की, —आजरबैजान, ह्या कास्पियन समुद्रात तेलरूपी अपार संपत्ती दडली ती बाहेर काढा—

त्या पुतळ्याच्या पायाजवळून संपूर्ण बाकू नगरी दिसते. ते पाहून असं वाटते की, आकाशातील इंद्रधनुष्य मानवानं वाकवून जमिनीवर अंथरले असून, त्याचंच नाव बाकू ठेवले आहे. इतकं ते शहर अप्रतिम, सुंदर दिसते नि मन थक्क होऊन जाते.

परत फिरताना हमीदसाहेबांनी मला विचारले, 'शाहीरे अझिज, कसं दिसतंय बाकू—?'

'तुम्ही श्रीमंत आहात—' मी उत्तर दिले, पण ते त्यांना रुचलं नाही ते नाराज होऊन म्हणाले,

'तुम्ही आम्हांला श्रीमंत म्हणू नका. तुम्ही आम्हांला आजाद म्हणा.'

'तुम्ही आजाद आहात म्हणजेच तुम्ही वैभवशाली आहात नि म्हणूनच श्रीमंत आहात.' या माझ्या खुलाशानं ते हसले आणि ऐकू लागले. मी म्हणालो,

'मॉस्को पहावं संध्याकाळी, लेनिग्राड पहावं दिवसा, स्टालिनग्राडचा मर्दपणा युद्धात आणि बाकचे सौंदर्य रात्री इथं उभं राहून पहावं, असं माझं मत झालं—'

या माझ्या मतावर हमीदसाहेब फार फार खूष झाले. आजरबैजान हा कवींचा देश असल्यामुळे माझे वरील विधान त्यांना इतकं आवडलं की, हमीदसाहेबांनी तर ते लगेच पाठ केले.

आणि ते विधान दुसऱ्या दिवशी रेडिओवर माझं मलाच ऐकू आलं.

बाकू या शब्दाचा अर्थ अग्नी असा होतो, असं मला सांगण्यात आले. तेव्हा ही आग इतकी सुंदर कशी याचं मला आश्चर्य वाटलं. बाकू शहराच्या

आसपास हजारो तेलाच्या विहिरी आहेत. तेल म्हणजे आग, यावरून कदाचित त्या शहराला आग (बाकू) असं नाव दिलं असावं. बाकूच्या परिसरात अनेक, नव्हे हजारो तेल विहरी आहेत, त्यापैकी काहींचं वय शंभर वर्षांचं तर काहींचं दहा वर्षांचं आहे. त्यांपैकी काही अडीच मैल खोल आहेत.

जमिनीच्या पोटातून अपरंपार तेल काढून हा देश संपन्न होत आहे. जमिनीतून तेल काढण्यात या देशाची माणसं कुशल आहेत.

आता तर त्यांनी सागरावर चढाई आरंभली आहे. निसर्गाशी दारुण संघर्ष सुरू केला आहे. कास्पियन सागरावर कित्येक मैल आत जाऊन त्यांनी सागरावर एक लहानसं शहरच वसवलं आहे. त्या शहरापर्यंत सागरावरून मार्ग काढला आहे नि त्या मार्गानं त्या नगराचे जगाशी संबंध जोडून एक नवे आश्चर्य प्रस्थापित केले आहे.

त्या कास्पियन सागरावरील शहरात राहणारे लोक पाण्याचा अंत घेऊन मग त्या सागराखाली बेरंगी मारून सागतळाखालचे तेल काढीत आहेत. आणि ते तेल सागरातून निघून सरळ एका नळानं योग्य स्थळी पोहोचत असते. परंतु या कार्यात या लोकांना निसर्गाशी भयंकर असा संघर्ष करावा लागत असून, कित्येक वेळी प्राणही द्यावे लागतात आणि ती माणसं कसलीच कुचराई करीत नाहीत. खवळलेल्या कास्पियन समुद्राचा सर्व साधनांनीशी प्रतिकार करून निसर्गावरचे आपले प्रभुत्व कायम राखतात. म्हणूनच या आजरबैजान लोकांचे जीवन सुखी नि समृद्ध झाले आहे. शिक्षण तर त्यांचा स्थायीभाव झाला.

बाकूत आम्ही एका मशिदीत शिरलो. तेव्हा काझीसाहेबांनी आमचं स्वागत केलं. सोविएत देशात धार्मिक विधीला बंदी असते, असा जो खोटा प्रचार रूढ आहे, त्याला बाकूत उत्तर मिळते. त्या ठिकाणी कित्येक आजरबैजानी येऊन नमाज पढून जातात. निघते वेळी काझीसाहेबांनी भारतीय

मुसलमानांना अभिवादन सांगा. अशी विनंती केली. तिचा सादर स्वीकार करून आम्ही निरोप घेतला.

त्याच दिवशी आम्ही आजरबैजान सुप्रिम सोविएतच्या अध्यक्षांची भेट घेतली. त्या अलिशान इमारतीत प्रवेश करताच एका रेड आर्मीनं खाडकन् सॅल्यूट ठोकला तसा मी हसलो. कारण माझं मला नवल वाटलं. कुठं मी आणि कुठं आजरबैजान.

हे सुप्रीम सोविएतचे अध्यक्ष अत्यंत प्रेमळ, नम्र नि विद्वान आहेत. त्यांनी अगदी हृदयापासून आमचे स्वागत केलं. मग बोलणं सुरू झाले.

माझ्या सोविएत दौऱ्यात मी कुणाला कसलाच प्रश्न विचारीत नसे. मात्र रशियन माणसाचा प्रत्येक शब्द मी टिपून घेत होतो. आमच्या लखनौच्या, पुष्कराजने त्यांना एक प्रश्न विचारला की, 'तुम्ही आजरबैजानचे अध्यक्ष' तुम्ही सोविएत संघराज्याच्या अध्यक्षांना कोणत्या भाषेत पत्र लिहिता? हा प्रश्न ऐकून हसून ते म्हणाले,

'मला रशियन आणि आजरबैजान या दोन्हीही भाषा येतात नि आमच्या अध्यक्षांना आजरबैजान भाषा येत नसेल, तर मग मी त्यांना आजरबैजान भाषेत पत्र लिहून त्याचं काम सोपं होईल का अवघड होईल—? रशियन माणूस आपलं काम आपण होऊन अवघड करीत नाही.'

दुसऱ्या दिवशी बाकूपासून एकशेऐंशी किलोमीटरवर असलेले एक सामुदायिक शेत पाहयला निघालो. मार्गात आम्ही अनेक खेडी पाहिली. आता सोविएत संघराज्यात अघटित चमत्कार झाला असून, खेडे नि शहर यात कसलेच अंतर उरलेले नाही. खेडी आता शहराचा दर्जा घेऊन बसली आहेत. ती लहान असतात नि तेथील लोक शेतावर काम करतात. म्हणूनच त्यांना खेडं म्हणावं लागतं आहे, एवढंच. आमची मोटार एका नदीच्या पात्रात उतरली होती. ती नदी घनदाट झाडीतून गेली होती आणि पाणी वाळूबरोबर वाहत होतं. मध्ये वाळूचा एक ढीग होता नि एक माणूस

त्या ढिगावर उताणा पडला होता. त्याचा पोशाख अगदीच मळकट दिसत होता. त्याला पाहताच माझी खात्री झाली की, हा एक दरिद्री नि दुर्दैवी असून, मरून पडला आहे.

मी लगेच मोटार थांबवून बाहेर पडलो. समाजवादी देशात तो मला पहिला दरिद्री नि बेवारसी दिसला. मी हमीदसाहेबांना त्याचं कारण विचारताच सर्वच मोटारीबाहेर पडून त्या इसमाला हाका मारू लागले, पण तो हुं का चूं करीत नव्हता. त्याच्या सभोवती पाण्याची धार वाहात असल्यानं त्याच्यापर्यंत जाता येत नव्हतं आणि मी तेथून हलत नव्हतो. मग मोठी आरडाओरड केली, पण यश आलं नाही. हा नक्कीच मेला असावा, अशी माझी खात्री झाली.

मग शेवटचा उपाय सुरू झाला. आमच्या बरोबरीचे सर्व पाहुणे त्या उताण्याला वाळूचे खडे मारू लागले. म्हणजे एक प्रकारे त्याच्यावर दगड-फेकीला आरंभ झाला. परंतु कुणाचाच दगड त्याला लागत नव्हता नि तो गप्प पडला होता.

अखेर कुबाच्या मेयरना यश आलं. नि त्याचा दगड जाऊन नेमका त्याच्या पोटावर बसला. तसा तो चटकन उठला आणि आपण बेवारशी मेलो नाही, याची त्यानं ग्वाही दिली आणि माझा एक भ्रम दूर झाला.

'तू का पडला आहेस—?' मेयरनी विचारले, तेव्हा उजव्या हाताचा अंगठा तोंडाला लावून तो म्हणाला,

'सकाळीच थोडी घेतली आहे नि ऊन पडलं आहे म्हणून निवांत पडून आराम करतोय—'

हे ऐकून तो भयंकर आराम पाहून मी भानावर आलो. त्या आराम कर-णाराच्या अंगावरची मळकी कापडं भलतीच महागडी आहेत, हे मला नंतर कळून आले.

तो सामुदायिक मळा पाहून झाल्यावर मी एका दुमजली घरात शिरलो.

माझ्या मागून सर्वच मंडळी आली. ते एका शेतकऱ्याचे घर होते. तिथं दहा माणसं राहात होती. त्यांपैकी पाच शेतावर काम करीत होती नि पाच मुलं शाळा शिकत होती. या घरात मला दोन रेडिओ, एक टेलेव्हिजन नि एक टेलिफोन दिसला. प्रत्येकाची निराळी खोली, पलंग गाद्या, आरसे वगैरे पाहून मला आमच्या इकडच्या जुन्या सरदारच्या ऐश्वर्याची आठवण झाली.

रशियात मला सर्वत्र असाच अनुभव आला. कुठंही जीवनात विसंगती दिसली नाही. सर्वत्र जीवन एका पातळीवर उभं आहे आणि सारखं फुलत आहे. या दौऱ्यात मी विमान, रेल्वे, मोटार आणि पाय या सर्व साधनांचा वापर केला आणि तो महान देश पाहिला. मला आनंदी, स्वच्छंदी, नम्र नि शहाणी माणसं भेटली. ताशकंद ते बाकू हे अंतर फार मोठे आहे नि ते अंतर कापीत मी जात होतो. परंतु मला एक दुर्बल, निकामी, भिकारी, उपाशी, आळशी असा माणूस दिसला नाही. याचं कारण समाजवाद.

कॉ. लेनिननं तिथं समाजवादी दुनिया निर्माण केली आहे. ती मला स्वप्न सृष्टीसारखी भासत होती नि स्वप्न सृष्टीत माझे भ्रमण सुरु होते.

रशियन माणूस भरपूर खातो आणि फार चवीनं उशीर खातो. भरपूर पितो. तिथं पाणी पित नाहीत. तो भरपूर आराम करतो. कारण तो भरपूर काम करतो. काम करणे हे त्याचे आद्य कर्तव्य असतं. श्रम हाचा तिथं धर्म आहे नि रशियन मानव तो धर्म काटेकोर पाळतो आणि त्यातच त्याच्या प्रगतीचे गमक आहे.

तो जितकं प्रेम कारखान्यावर करतो अगदी तितकंच प्रेम तो आपल्या कलेवर करतो. रशियन माणूस भलताच कलाप्रिय आहे, याची प्रचीती मला मॉस्कोतील प्रख्यात बोल्शिव्हीक थिएटरात आली. तिथं मी 'दगडाचे फूल' हा ऑपेरा पाहिला. त्यावेळी थिएटरात एकही जागा रिकामी नव्हती. प्रेक्षकांनी ते नाट्यगृह भरलं होतं. नि त्यांच्यासमोर दोनशे कलावंत एकाचवेळी रंगमंचकवर सूत्रबद्ध काम करीत होते. दोनशे वादकांचा ताफा

संगीताचे स्वर निर्माण करून वातावरण भारून काढीत होते. संगीतानं तिथं इंद्रधनुष्य निर्माण केले होते. प्रत्येक अंकाला संगीत दिग्दर्शकाचे प्रदीर्घ टाळयानं स्वागत होत होतं. रशियन माणूस नुसतंच कष्ट करीत नसून कलेची कदरही करतो. याचाच अर्थ त्याचे जीवन सर्व दृष्टीनं सफल नि समृद्ध झाले आहे.

मॉस्को, लेनिनग्राड, स्टालिनग्राड व बाकू या शहरात मला मुळीच विसंगती दिसली नाही. मात्र वैशिष्टय, रचना, निराळी नि आगळी वाटली.

तीन दिवस बाकू पाहून नंतर त्या महान बाकूचा, आजरबैजान राजधानीचा निरोप घेतला. तेव्हा माझे पाव्हणे (अझीज) हमीदसाहेब मला सोडत नव्हते. ते गंभीर नि दु:खी दिसत होते नि मी मनात दग्ध झालो होतो.

७. कलेचे माहेर

बरोबर सात वाजता आमचे विमान ताश्कंद विमानतळावर उतरले, तेव्हा सूर्य मावळत होता नि ताश्कंदवासी मित्रांनी विमानतळावर गर्दी केली होती. अनेक तरुण–तरुणी फुलांचे करंडे घेऊन आमच्या स्वागतासाठी हजर होते.

त्या गर्दीत कॉ. नबीमोहमद हे पुढे होते. ते दिसण्यात एखाद्या सिनेनटा-सारखे दिसत होते, पण ते सिनेनट नव्हते. एक फार मोठे साहित्यिक

आहेत. त्यांना हिंदी, उर्दू, अरबी, फ्रेंच, जर्मन, रशियन अशा अनेक भाषा येतात. नुकताच त्यांनी सरदार जाफरी या भारतीय उर्दू कवीच्या काव्याचा उझबेकी भाषेत अनुवाद केला असून, भारत–रशिया मैत्रीसंघाचे ते सर-चिटणीस आहेत. त्यांनी आमचे स्वागत केले नि त्याच वेळी त्यांची व माझी दोस्ती झाली.

हे उझबेकीस्थान पूर्वी रखरखीत वाळवंट म्हणून प्रसिद्ध होते. रशियात महान समाजसत्तावादी क्रांती झाल्यानंतर तब्बल सात वर्षांनी ते सोव्हिएत संघराज्यात सामील झाले आणि मगच त्याच्या प्रगतीचे शकट भरधाव निघाले. मग त्याच्या गतीला सीमाच उरली नाही. वैराण वाळवंटावर नंदनवन बहरू लागले आणि श्रमजीवी मानवाच्या श्रमानं वाळूवर सोनं पिकू लागलं.

आज उझबेकीस्थानची उन्नती पाहून माणूस तोंडात बोटं घालतो. पूर्वी इथं बुरखापद्धती भयंकर होती. स्त्रियांना बुरखा घ्यावा लागत होता. पण आज तिथं एकही बुरखा दिसत नाही. उलट सर्व महत्त्वाच्या जागी स्त्रियाच असल्याचे दिसून येते. याचे एकच उदाहरण म्हणजे उझबेकीस्थान या घटक राष्ट्राच्या अध्यक्षपदावर एक स्त्री आज विराजमान आहे आणि एकूण एक माणूस तेथे साक्षर आहे. जिथं जिथं मी गेलो, तिथं तिथं मला सोविएत देशाच्या प्रगतीबरोबर सोविएत कलेचंही दर्शन झालं. त्या जनतेला कलेचे तर वेड आहे !

आपल्याकडे काही जागी वजनाची यंत्र दिसतात. तशी यंत्रं मी मॉस्कोत पाहिली परंतु ती वजनाऐवजी दोन रुबल तोंडात टाकताच प्यालाभर थंड शरबत देतात. हे सांगण्याचे कारण एवढेच की, रशियात यंत्र माणसाची अगदी पाहुण्याप्रमाणे सेवा करतात. शरबत देणाऱ्या यंत्रांपासून दिगंतराचा भेद करणाऱ्या रॉकिटपर्यंत त्यांनी मारलेली दौड सर्वश्रुत आहे. मी त्यांचे वर गेलेले रॉकेट पाहिले नाही. मात्र जे वर जाऊन परत आले आहे, ते मला

दिसले, पण तेही लगेच मी विसरून गेलो. आणि सोविएत कला, जीवन पाहण्यात दंग झालो. मॉस्कोत मी बोल्शॉय थिएटरात 'दगडाचे फूल' हे नृत्यनाटय पाहिले. पहिल्या झपाटयात मी ते नाटयगृह पाहून मंत्रमुग्ध झालो. त्याची ती भव्य रचना, त्या पितळी रंगाच्या गॅलऱ्या नि समोरचे प्रचंड स्टेज, लाल मखमली खुर्च्या हे सर्व काही अप्रतिम आहे. तशीच त्या रंगभूमीची म्हणजे त्या नाटयगृहाची प्रतिष्ठाही थोर आहे.

शेकडो वादक संगीताचे इंद्रधनुष्य निर्माण करीत होते. आणि त्या नादावर शेकडो कलावंत आपल्या कलेचा सुंदर आविष्कार करीत होते. एकही कलावंत इकडे का तिकडे होत नव्हता की त्यांचे पाऊल चुकत नव्हते. एक तरुण मुलगी तर पायाच्या अंगठयावर भोवऱ्याप्रमाणे गरगर फिरत होती.

रशियन जनता आपल्या कलावंतांचे किती कौतुक करते हेही मला दिसले अंक संपताच दीर्घ टाळयांचा गजर होई. मग सर्व कलावंतांना प्रेक्षकांसमोर यावे लागे आणि ते आले की पुन्हा टाळयांचा वेग वाढे. याला म्हणतात सहर्ष कौतुक.

मॉस्कोत मी दुसरं एक नाटक पाहिलं. ते नाटक सर्व लहान मुलांनी लहान मुलांसाठी केलं होतं. ते थिएटरच लहान मुलांचं असून, तिथं नियमानं लहान मुलांसाठी नाटकं खेळली जातात. आणि नवल असं की, तिथं छोटया प्रेक्षकांची तोबा गर्दी असते. तिकिटासाठी त्यांना रांग लावावी लागते. त्या सर्वांचे निरनिराळे आकार, रंगीबेरंगी पोशाख नि सर्वांची ती धावपळ पाहून मी तर थक्कच झालो!

रशियात सर्वत्र सिनेमा-नाटक यांच्या प्रयोगापूर्वी कर्कश घंटा वाजत नाही, प्रयोगाची वेळ झाली की सर्व दिवे पुन: पुन्हा विझून पेटतात आणि मग बाहेर गेलेले प्रेक्षक येऊन आपापल्या जागेवर बसतात.

लेनिनग्राड येथे मी एक सिनेमा पाहिला. उशिरा आल्यामुळे मला अगदी

पुढील रांगेत जागा मिळाली होती. चित्रपट सुरू होताच सारं थिएटर मोटारीवर बसून चालू लागल्याचा आभास निर्माण झाला. सर्वांच्या पुढं मी असल्यानं आपण सर्वांपुढे कुठे तरी जात आहोत, असं मला वाटू लागलं. मी हळूच आजूबाजूला पाहू लागलो. आलं आलं म्हणता एक मोठं कारंज जवळ आलं. त्याच्या पाण्याचे मोठे फवारे उडत होते. त्या फवाऱ्यांजवळ जाताच मी पाणी अंगावर येईल म्हणून अंग चोरून खाली वाकलो व आजूबाजूचे सर्व प्रेक्षक हसले. मी वरमून इकडे तिकडे पाहिले नि पुढे कॉ' लेनिनचा एक भव्य पुतळा आमच्याकडे आला आणि लगेच कॉ. लेनिन भाषण करू लागले. त्यांनी तो आपला ऐतिहासिक उंचावलेला हात अधिकच उंचावला नि महान ऑक्टोबर क्रांतीला प्रारंभ झाला. क्रांतिकारकांनी पहिला दरवाजा पाडून आत प्रवेश केला. या चित्रपटाचं तंत्रच मोठं विलक्षण होते ते प्रेक्षकांना सर्वत्र हिंडवत होते. कधी रेल्वेनं तर कधी विमानानं असं आम्ही रशियाभर हिंडत आहोत, असं वाटं होतं.

ताश्कंद येथे उतरलो त्याच दिवशी मला 'दिलाराम' हे सुंदर नाटक पाहायला मिळाले. याही वेळी आम्ही उशीरा थिएटरवर पोहोचलो. तेव्हा नाटक सुरू झालं होतं. आणि एकही तिकीट शिल्लक नव्हतं. आम्ही हिरमुसून उगीचच इकडे तिकडे पाहू लागलो. आणि याच वेळी भारतीय पाहुणे बाहेर आले असून, त्यांना तिकीट नाही, अशी बातमी आतील प्रेक्षकांना समजली. तसे आठ प्रेक्षक बसलेले उठून बाहेर आले व त्यांनी आपली तिकीटे आम्हांला देऊन ते निघून गेले. मग आम्ही त्यांच्या जागेवर जाऊन बसलो. पाहुण्यांचा मान राखण्याची उदात्त भावना मला नवीन वाटली. केवढं हे मोठेपण नि केवढी ही थोर समज! आम्ही आपल्या पाहुण्यांच्या जागेवर बसून ते नाटक पाहात होतो. ते 'दिलाराम' नाटक रंगभूमीवर आणण्यासाठी सरकारने लाखो रुबल खर्च केले होते, असं मला कॉ. नबींनी सांगितलं. एका नाटकासाठी सरकार लाखो रुबल खर्च करते, हे मी नवीनच ऐकले

आणि लाखो रुबल खर्चून निर्माण केलेले नाटक कसे असेल म्हणून अगदी बारीक नजरेनं मी त्याचं निरीक्षण करू लागलो. पहिल्या प्रवेशात मला कळून आले की, या समाजवादी देशात रंगभूमी वैभवाच्या शिखरावर उभी आहे.

त्या रंगभूमीवर एकाच वेळी अनेक माणसे दिसत होती. कधी जुन्या काळातील मोठा बाजार भरत होता, तर कधी फुलझाडांचे ताटवेच्या ताटवे आम्ही पाहात होतो. भव्य राजवाडे, उंच गोपुरं, भयाण तुरुंग, मोठमोठे साखळदंड व धिप्पाड सैनिक हे सारं पाहून मी तर स्वत:लाच विसरलो.

त्या नाटकाची कथा अगदी साधी होती. एका गरीब मुलीचं एका चित्रकारावर प्रेम असतं. एकदा बेहराम त्या मुलीला पाहतो आणि जबरदस्तीनं नेऊन तिला राणी करतो.

मग तो चित्रकार वेड्यासारखा आपल्या प्रेयसीला शोधीत राजधानीत येतो. एके ठिकाणी बाजारात ती राणी पालखीत बसून येते नि त्या दोघांची भेट होते, पुन्हा त्यांची दग्ध मनं हर्षभरित होतात. परंतु लौकरच ती गोष्ट राजाला समजते आणि राजा त्या चित्रकाराला तुरुंगात टाकतो. पुढे ती मुलगी आपल्या प्रियकराला घेऊन पळून जाते. परंतु वाळूच्या भयंकर वादळात सापडून ती दोघेही मरतात.

अशी ही साधी कथा त्या नाटकात इतक्या भव्य स्वरूपात दाखविली आहे की, पाहाणाऱ्याची मतीच गुंग होते. कला, तंत्र यांचा या नाटकात सुंदर संगमच झाला आहे. वाळवंटातील ते वादळ विजेच्या साहाय्यानं निर्माण केले होते, पण ते पाहाताना भीती वाटत होती.

मी तन्मय होऊन नाटक पाहात होतो. काही वेळा मोठ्यानं हसत होतो. तेव्हा माझ्या रांगेतील एका प्रेक्षकानं मला विचारलं,

" तुम्हाला रशियन कळतं ? "

" मग हसलात कसे ? " त्यांनी पुन्हा विचारलं आणि मी उत्तर दिलं,

" खरी कला ही सदैव काळजाशी भिडून बोलत असते. तिला कानांची गरज भासत नाही."

हे नाटक म्हणजे एका गुलाम मुलीनं एका जुलमी राजावर मात करून खऱ्या प्रेमासाठी केलेल्या आत्मबलिदानाची कहाणी आहे. ही कहाणी सर्व दृष्टीनं जीवननिष्ठ अशीच आहे. ती पाहात असताना प्राचीन राजशाही किती क्रूर नि बेबंद होती., याचं दर्शन घडतं. जुनी करवसुली, कैद्यांचें जीवन आणि राजदरबारातील एकमेकांविरुद्धचे हेवेदावे या सर्व गोष्टी त्या प्रेमकथेबरोबर बेमालूम सांगण्यात आल्या होत्या आणि प्रत्येक कलावंत आपल्या कलेत अगदी प्राण ओतून आपली भूमिका पार पाडीत होता, दिलारामाचं काम करणारी बाई तर मूर्तिमंत कलेचा अवतारच वाटत होती. चित्रकाराला हृदय अर्पण करते वेळीचा तिचा अभिनय पाहून भावना उचंबळून येत होत्या. तर जबरीनं राणी झाल्यानंतरचा तिचा अभिनय काळजाला पीळ पाडीत होता. त्यावेळी ती प्रेम हे जबरीनं दिलं जात नाही हे प्रत्येक हालचालीनं सांगत होती आणि खरं प्रेम कधीच मरत नाही, याची ती न बोलता ग्वाही देत होती.

हे नाटक पाहून बाहेर येताच कॉ. नबींनी विचारलं,

" कसं काय वाटलं हे नाटक ? "

तेव्हा मी उत्तर दिलं,

" हे नाटक म्हणजे खऱ्या प्रेमाचे एक भव्य स्मारक आहे आणि हे भव्य स्मारक सोविएत सरकारने लाखो रुबल खर्चून उभारले आहे. हा देश म्हणजे कलेचे माहेरघर आहे ! "

८. ताश्कंद ते दिल्ली

※ सोविएत रशियात मी त्या रशियन जनतेच्या जीवनाचे अनेक पदर पाहिले. तिचा अपार उद्योग, तिची विद्वता आणि कला, साहित्य आणि उदात्त संस्कृती हे सर्व पाहून मन थक्क झालं· जेव्हा आम्ही दिल्ली सोडली तेव्हा आमच्या या शिष्टमंडळातील काही प्रवासी उदासीन होते. सोविएत विरोधी भांडवलदारी प्रचाराची छाया आमच्या मनावर कायम होती. समाजवाद

करून करून किती प्रगती करू शकेल ? एकूण एक मानव सुखी करणे कुणालाच या जगात शक्य नाही. कुठं तरी पोकळी असणारच असंच काहीसं आमचं मत होतं.

लखनौचे श्री. पुष्कराज भट हे एक विचारवंत असून, ते आमदार आहेत. शिवाय ते कॉंग्रेस पक्षाच्या मताचे आहेत. कम्युनिस्टांबद्दल त्याचं मत अनुकूल नाही, पण मनानं ते फारच दिलदार आहेत. ते रशियात प्रत्येक गोष्ट अगदी चिकित्सक दृष्टीनं पाहात होते.

मॉस्कोपर्यंत पुष्कराज माझे मित्र झाले होते. आमचं दोघांचं मत होतं की, कितीही बिलंदर सत्ता असली तरी ती दारिद्रय दडवू शकणार नाही. ते नग्न असतं. आणि सर्वत्र दिसतं. म्हणून आम्ही ते पाहण्याची खटपट करीत होतो. आमच्यापुढे कसलाच पोलादी पडदा नव्हता.

पण जेव्हा आम्ही प्रवास करत ताश्कंद शहरात दाखल झालो, तेव्हा पुष्कराज संपूर्ण बदलले होते. रशियन जनतेची ती प्रगती पाहून आम्ही सर्वच प्रभावित झालो होतो. मात्र हिंडण्याचा कार्यक्रम आमचा कायम होता. मला रशियन मुळीच येत नव्हतं. तर श्री. पुष्कराज यांना थोडं थोडं कळत होतं. कसलीही पाटी दिसली की, ते उभे राहून एक एक रशियन अक्षर वाचत. मी नुसताच आ करून पाहात असे. रशियन येत नाही म्हणून मला फार वाईट वाटे.

एकदा दुपारचं जेवण उरकून पुष्कराज आणि आम्ही दोघं हिंडत हिंडत एका बागेत शिरलो. त्या बागेत पंधरा वीस इसम हिरवळीवर लोळत होते. काही वृत्तपत्रं वाचीत होते. काही पत्रं लिहण्यात निमग्न झाले होते. आम्हांला वाटले, ही बेकारांची झुंड असून, ही कामं शोधून वैतागली असावी आणि आता या बागेत येऊन पडली असावी. मी एका गृहस्थाजवळ बैठक मारली. मी माझ्या तीक्ष्ण नजरेनं त्या इसमाला न्याहाळून घेतला. त्यानं आपल्या करड्या पल्लेदार मिशा पिळून त्याचे आकडे केले होते. त्याचा

पोशाख नीटनेटका होता. त्यानं एक मोठं पुस्तक घेतलं होतं. मी विचारलं, 'तुम्ही असं का बसला आहात ?' 'मग कसं बसू ?' त्यानं विचारलं. तसा मी पेंचात पडलो. म्हणालो, 'नव्हे, तुम्ही यावेळी बागेत कसे ?'

'तुम्ही तसेच आम्ही,' त्यानं उत्तर दिलं. मग मी खुलासा केला की, आम्ही भारतीय असून, इंडो–सोविएत सांस्कृतिक संस्थेचे प्रतिनिधी आहोत. मला असं सांगा की, तुम्ही नोकरी कोठे करता, का बेकार आहात ? तो गृहस्थ पोटभर हसून म्हणाला, 'आम्ही फार फार नोकरी केली आहे आणि आता सेवानिवृत्त होऊन आराम करीत आहोत, आता पत्र वाचणे, नातलगांना पत्र लिहिणे एवढंच काम करीत असतो. आमच्या देशात तुम्हाला औषधालाही बेकार मिळणार नाही. इथं समाजवाद आहे.' पुढं मी काहीच विचारलं नाही. आम्ही लगेच ती बाग सोडली आणि परत निघालो.

चालता चालता पुष्कराज दिसतील त्या रशियन पाट्या उभं राहून वाचीत होते. एका सुंदर इमारतीपुढं एक लाल रंगाचा मोठा बोर्ड दिसला आणि पुष्कराज थांबून तो वाचू लागले. मी नेहमीप्रमाणे त्यांचेकडे पाहू लागलो. आणि आम्हांला पाहून येणारे जाणारे ताश्कंदचे नागरिक थांबून आम्हाला पाहू लागले. पुष्कराजनी ती पाटी वाचून होताच मी हिंदीत विचारले, 'कसली पाटी आहे ती ?' 'ही बँक आहे.' पुष्कराजनी मला हिंदीतून उत्तर दिले आणि बाजूला उभी असलेली एक तरुणी चटकन पुढे येऊन हिंदीत म्हणाली, 'ही बँक नसून आमची कायम स्वरूपाची निवडणूक कचेरी आहे.' हा खुलासा ऐकून आमचे चेहरे घडाघड पडले आणि आम्ही लगेच काढता पाय घेतला.

दुसऱ्या दिवशी ताश्कंदजवळ असलेले 'स्तालिन सामुदायिक शेत' पाहिलं. तो सामुदायिक मळा म्हणजे एक वेगळे राज्यच आहे आणि ते एक प्रकारचे आश्चर्यही आहे. कारण या मळ्याची स्थापना १९२९ साली

झाली, त्यावेळी फक्त तीनशे तीस एकर जमीन या मळयाच्या मालकीची होती. १९३४ साली या मळयात फक्त दोन ट्रॅक्टर काम करीत होते. परंतु आज एक हजार पाचशे हॅक्टर जमीन या मळयाच्या मालकीची असून, आता चौतीस ट्रॅक्टर तेथे काम करीत आहेत. तेथे सध्या ११०४ शेतकरी काम करीत असून, त्यांपैकी ४७५ स्त्रिया आहेत. या मळयात चार शाळा आहेत. दोन हजार पाचशे कोंबडया रोज मळयात अंडयांचा ढीग लावीत आहेत. अकराशे पाळीव गाईंचे दूध काढण्यासाठी तेथे निराळं दूधकेंद्र निर्माण करण्यात आले असून, एकाच वेळी १६ गाई स्वखुशीने येऊन दूध देत असतात. त्या मळयात १३ दूध काढणारी यंत्रे बसविली असून, गाई रांग लावून दूध देत असतात. या मळयाच्या मालकीची सात हजार पाचशे मेंढरे असून, त्या भागात तीनशे पंचाहत्तर घरे आहेत आणि मालाची ने-आण करण्यासाठी वीस मोटार ट्रॅक्स रोज पळापळ करत आहेत. शिवाय हायस्कूल, दवाखाना, जनावरांचा दवाखाना, प्रसूतीगृह, वगैरे सर्व पाहिलं की माणसाची मती गुंग होऊन जाते.

आम्ही गेलो तेव्हा द्राक्षाला नुकताच बहर आला होता, म्हणजे ती पिकली होती. काळी, जांभळी, गुलाबी, वाटोळी, लांबकुळी असे पंधरा प्रकार आणि आकार पाहिले की, सोविएत शेती सुधारणेचे कौतुक नव्हे तर आश्चर्य वाटू लागते. आम्ही ती सुंदर द्राक्षे गिळतच त्यांचे कौतुक करीत होतो. तो सुंदर मळा, ती संपन्न शेती, ती सुंदर फळं, फुलं नि सुखी माणसं पाहात आम्ही एका भव्य मंडपाखाली आलो. तो मांडव द्राक्षांच्या वेलींनी आच्छादला होता. सर्वत्र पिकलेल्या द्राक्षांचे घोस लोंबत होते. नि त्या मंडपाखाली आमच्या भोजनाची तयारी करण्यात आली होती. एका सुंदर टेबलावर अनेक प्रकारचे जेवण मांडले होते. त्यात खास भारतीय पद्धतीचा मसाला दरवळत होता. आणि त्या सुगंधात आम्हाला आपल्या घरची आठवण होत होती. या भोजनप्रसंगी मळयाच्या अध्यक्षांनी एक भावपूर्ण

असे भाषण केले. ते आमचं स्वागत करून म्हणाले, 'तुम्ही आमचे शेजारी आहात आणि शांततेचे पाईक आहात. तुमचे पंतप्रधान पं. नेहरू आज शांतता नांदावी म्हणून अलोट प्रयत्न करीत आहेत. याचा अर्थ तुमचे आणि आमचे उद्दिष्ट एक आहे. जर तुमची आमची मैत्री चिरकाल राहील तर जगात कधीच युद्ध होणार नाही. जोपर्यंत भारत-रशिया एका शांततेच्या फळीत उभे आहेत, तोपर्यंत जगात युद्ध होणार नाही, अशी आमची श्रद्धा आहे. म्हणून भारत-रशिया हे दोन देश चिरायू होवोत.'

रशियात मी जिथं गेलो, तिथं मला शांततेचा जयघोष ऐकू आला. तिथं प्रत्येक माणसाला शांततेचे वेडच जणू लागले आहे. याचा अर्थ ती जनता दुबळी आहे, असा कोणी घेऊ नये. ती जनता महान आहे आणि प्रबळही आहे. भारत आणि रशिया या दोन देशांच्या हाती जागतिक शांतता सुरक्षित आहे, अशी तिथं सर्वांची श्रद्धा आहे. तिथं वृद्ध माता आपल्या मुलानी व्यर्थ रणात मरू नये नि कुणाला मारू नये, या एकाच विचारात आहे. त्यांनी जगाव आणि या देशाला संपन्न करावं, आम्हाला शांतता हवी. कारण शांततेच्याच काळात जीवनाला बहर येतो. कला प्रगत होते. फुलं फुलतात. असा आमचा अनुभव आहे. युद्धाने काय होतं हे आम्ही प्रत्यक्ष पाहिलं आहे म्हणून आम्हाला युद्ध नको. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे शांततेसाठी झटणाऱ्या आमच्या पंतप्रधानांना समग्र रशियन जनता लाख लाख दुवा देत आहे. रक्तपात नसावा हा सर्वत्र मंगल असाच हेतू आहे. या हेतूत अहंकार नाही. फाजील दुराभिमान नाही. मी तर असं म्हणेन की यात पवित्र हेतू आहे. आणि यात साऱ्या जगाचे कल्याण सामावले आहे. रशियन लोक भारताला आपला खरा मित्र मानतात. म्हणूनच ते भारतीय संस्कृतीचा कसून अभ्यास करीत आहेत.

ताश्कंद येथे आम्ही एक शाळा पाहिली. तिथं एकूण एक मुलं हिंदी भाषा शिकत होती. आम्ही शाळेत प्रवेश करताच आम्हाला भारतीय वातावरण

जाणवलं. प्रत्येक मूल प्रत्येक शब्द हिंदीत उच्चारीत होतं. त्यामुळे माझी पाथावर धारण बसत होती. कारण माझी हिंदी मुंबईची हिंदी ! एखादा उच्चार चुकला की ही बेरकी पोरं अश्रू घेणार अशी मला भीती वाटत होती. म्हणून मी फार कमी बोलत होतो. त्याच दिवशी आम्ही ताश्कंद विद्यालयाला भेट दिली. त्यावेळी त्या विशाल सभागृहात अफाट गर्दी झाली होती. आम्ही जरा उशिराच पोहोचलो. पण ते गुणी विद्यार्थी आम्हांवर रागावले नव्हते. आम्ही सभागृहात प्रवेश करताच सर्व मुलं-मुली उठून त्यांनी टाळया वाजवून आमचे स्वागत केले, एका सुंदर मुलीनं लाल गुलाबाची फुलं माझ्या हाती देऊन सांगितले. 'ही आमच्या देशातील फुले तुम्ही भारतापर्यंन्त घेऊन जा आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्या वीरांनी आत्मबलिदान केले, त्यांच्यां समाधीवर ती अर्पण करा... ' हा त्या मुलीचा संदेश नि ती फुलं पाहून काळजात एक कळ उठली आणि भारतानं स्वातंत्र्य मिळवून आपली मुक्ती करून घेतली याला जगात आणि रशियात किती महत्त्व आहे. याची मला महती पटली.

रशियन माणसांना स्वातंत्र्य हा शब्द अतिशय प्रिय आहे. स्वतंत्र मानवा-बद्दल त्यांना फार प्रेम वाटते, नि जे परदास्यात खितपत आहेत. त्यांच्या-विषयी अत्यंत आदर आणि तितकीच आस्था त्यांना वाटते.

आला आला म्हणता तो दिवस आला ! आपल्या मायदेशाकडे निघण्याची आमची तयारी झाली. सोविएत जेट विमान सज्ज झाले आणि माझ्या हृदयाने ठाव सोडला. कॉ. बाश्रिकोव, श्रीमती ईराना, मॉक्सीवोव, कॉ. नबी महमद ही मंडळी विमानाच्या थेट शिडीपर्यन्त येऊन उभी राहिली. सर्वांच्याच हृदयात कालवाकालव सुरू होती. डोळे भरत होते. मी अश्रू दडवीत होतो. आम्ही कडकडून भेटलो. ती अंतिम भेट होती. त्या महान देशाचं ते अंतिम दर्शन होतं. अंतरीची कळ दाबण्याचा बहाणा केला. उगीचच खिसे चाचपले. म्हणालो—' अरे ! सिगरेट संपली की ! फक्त

बोसष आहेत ' तेव्हा मला मिठी मारून कॉ. मॉक्सीमोव म्हणाले, ' हे रशियन जेट विमान आहे. तुम्ही दोन सिगारेट संपविण्यापूर्वीच तुम्हाला ते तुमच्या राजधानीत पोहोचवील.' मी आश्चर्यानं पाहिलं नि ते पुन्हा म्हणाले, 'हे सरळ तुम्हाला हिमालयावरून घेऊन जाईल.' आणि आता आपण आपल्या हिमालयावरून आपल्या मातृभूमीस जाणार या कल्पनेनं मी भारावून गेलो. कॉ. बाम्निकोव यांनी मला आपला सुंदर पेन दिला आणि तो पेन, ती गोड आठवण आणि त्या महान देशाचं अंतिम दर्शन घेऊन विमान उडाले आणि त्याची ती जबर भरारी सुरू झाली.

यावेळी मनात निराळ्याच भावना उचंबळून उठल्या होत्या. मी वयाच्या अकराव्या वर्षी मुंबईत आलो. त्यावेळी आमचं सारं कुटुंब दरमजल दरकोस करीत मुंबई जवळ करीत होतं. गाडी खर्च नव्हता म्हणून आम्ही मुंबईला पायी चालत निघालो होतो. चालून माझे पाय सुजले होते. दोनशे सत्तावीस मैलांचे अंतर कापायला आम्हाला दोन महिने लागले होते.

आणि आता तोच मी मिनिटाला दहा मैल भरारी मारीत होतो. तीस हजारांपेक्षाही जास्त उंचीवरून आमचे विमान उडत होते. मी खाली पाहात होतो. तेव्हा हिमालयाच्या मस्तकावर निसर्ग नुकताच हिमाचा वर्षाव करत होता आणि महान गिरिराज आमच्या सरहद्दीवर आपले अनंत बाहू पसरून ताठ उभा होता. त्याचं ते दर्शन आणि सोविएत रशियाची स्मृती मी कधीच विसरणार नाही. नव्हे, ती विसरणंच शक्य नाही. रशियातील माझं भ्रमण म्हणजे माझ्या जीवनाचे एक साफल्य मी मानतो.

नकळत मायदेशाची ओढ वाढू लागली. त्या नादात मी एक सिगरेट ओढून टाकली आणि दुसरी पेटविली, तोच लाल पाटी लागली आणि दिल्ली दिसू लागली.